गुरूवार, १६ नोव्हेंबर २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - १००
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) THURSDAY 16 NOV. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-03 ●ISSUE-100 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-10 ●PRICE-05



## विराट नवा शतकाधीश

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** सचिन तेंडुलकरच्या अविश्वसनीय ४९ वनडे शतकांचा विक्रम मोडत विराट कोहलीने वर्ल्डकप स्पर्धेतील न्यूझीलंडविरुद्धच्या सेमी फायनल लढतीत ५०व्या शतकाला गवसणी घातली. लॉकी फर्ग्युसनच्या चेंडूवर धाव घेत विराटने हा विक्रम नावावर केला. काही दिवसांपूर्वीच दक्षिण आफ्रिकेविरुद्ध विराटने सचिनच्या विक्रमाची बरोबरी केली होती. बुधवारी मुंबईत उष्ण आणि आर्द्र वातावरणातही विराटने संयमी खेळ करत खणखणीत शतकाची नोंद केली. विराटचं आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधलं ८० वं शतक आहे. कसोटी प्रकारात विराटच्या नावावर २९ तर ट्वेन्टी२० प्रकारात एका शतकाची नोंद आहे. २००९ मध्ये विराटने वनडे कारकीर्दीतील पहिल्यावहिलं शतक झळकावलं होतं. १४ वर्षांनंतर विराटने वनडे शतकांचं अर्धशतक पूर्ण केलं आहे. विराटचं वनडेतलं न्यूझीलंडविरुद्धचं हे सहावं शतक आहे. मायदेशातलं कोहलीचं हे २२वं शतक आहे. भारतीय कर्णधार रोहित शर्मा आणि शुबमन गिल यांनी दिलेल्या ७१ धावांच्या सलामीनंतर रोहित बाद झाला. विराटने नेहमीप्रमाणे एकेरी दुहेरी धावांसह डावाला सुरुवात केली. प्रचंड उकाड्यामुळे विराटलाही क्रॅम्प्सचा त्रास जाणवला मात्र या कशानेही त्याच्या एकाग्रतेवर परिणाम झाला नाही. वर्ल्डकप स्पर्धेत बाद फेरीच्या सामन्यांमध्ये चांगली कामगिरी नसणाऱ्या विराटने या शतकासह सगळं अपयश धुवून काढलं. शतकानंतर मैदानात उपस्थित मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरला कुर्निसात करत विराटने ५०वं शतक साजरं केलं. टीम साऊदीच्या चेंडूवर मोठा फटका मारण्याचा कोहलीचा प्रयत्न डेव्हॉन कॉनवेच्या हातात जाऊन विसावला. विराटने ९ चौकार आणि २ षटकारांसह ११७ धावांची मॅरेथॉन खेळी साकारली. विराटच्या शतकी खेळींचं वैशिष्ट्य म्हणजे भागीदाऱ्या. विक्रमी ५०व्या शतकादरम्यानही विराटने भागीदाऱ्यांची परंपरा कायम राखली. विराटने शुबमन गिलच्या साथीने ८६ चेंडूत ९३ धावांची भागीदारी केली. दुखापतीमुळे गिल तंबूत परतल्यानंतर विराटने श्रेयस अय्यरच्या साथीने १२८ चेंडूत १६३ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी साकारली.

# मोदी अदानींना देतात तेवढा पैसा मी गरिबांना देणार


## राहुल गांधी : पंतप्रधानांच्या टीकेला दिले प्रत्युत्तर

आधुनिक केसरी न्यूज

**रायपूर : पंतप्रधान नरेंद्र मोदी माझ्यावर जितकी टीका करतील, मला जितक्या शिव्या देतील, दूषणे देतील तितका माझ्यातला हुरुप वाढत जाईल, असे म्हणत कॉंग्रेस नेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या टीकेला उत्तर दिले. 'मूर्खांचे सरदार' असे म्हणत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राहुल गांधींचे नाव न घेता त्यांच्यावर टीका केली होती.**

**मूर्खांचे सरदार असा उल्लेख :** राहुल गांधी यांचे नाव न घेता पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, कॉंग्रेसच्या काही शहाण्यांनी टीका केली. भारतातील लोक चीनमधून आलेले मोबाइल वापरतात, असे त्यांनी सांगितले. अरे मूर्खांच्या सरदारा, तू कोणत्या जगात राहतोस? भारताच्या यशाकडे दुर्लक्ष करण्याच्या मानसिक आजाराने कॉंग्रेस नेत्यांना ग्रासले आहे. त्यांनी कोणता परदेशी चष्मा घातलाय, ज्यामुळे त्यांना भारत दिसत नाही, याचे मला आश्चर्य वाटते. कॉंग्रेसवर टीका करत असतानाच पंतप्रधान मोदी यांनी सांगितले की, भारत आता मोबाइल उत्पादन करणारा जगातला दुसऱ्या क्रमांकाचा मोठा देश बनला आहे, असे मोदी म्हणाले होते त्यावर आता राहुल गांधी यांनी प्रत्युत्तर दिले आहे.





राहुल गांधी पुढे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी जिथे कुठे जातात, तिथे माझ्याविषयी चुकीचे शब्द प्रयोग करतात. मला शिव्या द्या, माझ्या विषयी उलटसुलट बोलता. चांगले आहे, मला काही फरक पडत नाही. मी माझे लक्ष्य काय आहे ते तुम्हाला सांगितले आहे. मला कितीही दूषणे दिली तरीही माझे लक्ष्य ठरलेले आहे. जितके पैसे नरेंद्र मोदी अदाणींना देतात तेवढा पैसा मी गरीबांना देणार. एक रुपया तुम्ही अदाणींना दिलात तर एक रुपया मी गरीबांना देणार. त्यात छोटे दुकानदार, मजूर, बेरोजगार युवक सगळेच असतील. मी तुम्हाला सांगेन की खरे राजकारण अब्जाधीशांना मदत करुन होत नसते. खरे राजकारण गरीब शेतकरी, मजूर, छोटे दुकानदार यांना मदत केल्यानंतर होते. तुम्हाला मला जे काही बोलायचे आहे ते बोला. ज्या शिव्या द्यायच्या आहेत त्या द्या. मला जितक्या शिव्या देता त्यावरुन मला कळते की मी बरोबर काम करतो आहे. जेवढ्या शिव्या द्याल मला कळते मी योग्य मार्गावर आहे. मी चांगले काम करतो, तुम्ही चिडता म्हणून तर शिव्या देता ना? असेही राहुल गांधी यांनी म्हटले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी कॉंग्रेस पक्षावर जोरदार टीका केली होती. देशात पाच राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका असल्यामुळे प्रचाराची धामधूम सुरू आहे. त्यातच राजकीय नेते एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करण्याची एकही संधी सोडताना दिसत नाहीत. नुकतेच पंतप्रधान मोदी यांनी कॉंग्रेसचे नेते राहुल गांधी यांना मूर्खांचे सरदार असल्याचे संबोधले. भारतात वापरले जाणारे मोबाइल हे शक्यतो चीनमधून तयार होऊन आलेले आहेत, अशी टिप्पणी राहुल गांधी यांनी केली होती. या टीकेला प्रत्युत्तर देत असताना पंतप्रधान मोदी म्हणाले, भारत आता एक लाख कोटी रुपयांहून अधिक किंमतीचे मोबाइल निर्यात करणारा देश बनला आहे. कॉंग्रेस नेते भारताच्या यशाकडे दुर्लक्ष करण्याच्या मानसिक आजाराने ग्रासले आहेत.

# जागावाटपाबाबत वंचित आघाडीची रोखठोक भूमिका

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** महाविकास आघाडीचे आगामी लोकसभा निवडणुकीसाठी जागावाटप झाल्याची माहिती समोर आली



आहे. महाविकास आघाडीच्या नेत्यांमध्ये लोकसभेच्या 48 जागांपैकी 44 जागांवर चर्चा पूर्ण झालीय. तर चार जागांवर चर्चा सुरु आहे. वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर सोबत आल्यास अकोल्याची जागा त्यांच्यासाठी राखीव ठेवली जाईल, अशी चर्चा महाविकास आघाडीत झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. पण या जागावाटपाच्या वृत्तावर वंचित बहुजन आघाडीकडून रोखठोक भूमिका मांडण्यात आली आहे. वंचित बहुजन आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष सिद्धार्थ मोकळे यांनी महाविकास आघाडीला मोठा इशारा दिला आहे.

महाविकास आघाडीने वंचित बहुजन आघाडीला सोबत घेतलं नाही तर प्रकाश आंबेडकर प्रत्येक मतदारसंघात उमेदवार देऊ शकतात. त्यामुळे त्याचा मोठा फटका महाविकास आघाडीला बसू शकतो. गेल्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या वेळी वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अनेक ठिकाणी तीन नंबरला होते. लोकसभेत वंचितच्या उमेदवारांनी 41 लाख मतदान घेतलं होतं. त्यामुळे वंचित बहुजन आघाडीला सोबत न घेणं महाविकास आघाडीला भारी पडू शकते. विशेष म्हणजे जागावाटपाच्या बातम्यांवर सिद्धार्थ मोकळे यांनी महाविकास आघाडीला थेट इशाराच देवून टाकला आहे. महाविकास आघाडीच्या 44 जागांचे वाटप झाल्याची बातमी पाहण्यात आली. 4 जागा शिल्लक असून त्यावर चर्चा सुरु असल्याचे त्या बातमीत म्हटलं आहे. महाविकास आघाडीच्या नेत्यांना आणि महाविकास आघाडीला आमचे सांगणे आहे की, तुम्हाला आमच्यासोबत सुरुवातीपासून जुळवून घ्यायचं नाही हे आम्हाला माहिती आहे. हे दिसतंय आणि हे लोकांनाही दिसून आलं आहे. त्यामुळे आता उगाच वेड्याचं सोंग घेऊन पेडगावला जाण्याची गरज नाहीय, अशी टीका सिद्धार्थ मोकळे यांनी केली. 44 झाल्या, 4 शिल्लक आहे हे करण्यापेक्षा, तुमच्यात 48 जागांचे वाटप झाले, अशी बातमी देऊन एकदाच मोकळे व्हा. ते तुमच्यासाठी चांगलं राहील. फुले, शाहू, आंबेडकर विचारधारेवर विश्वास असलेल्या जनतेने आणि मतदारांनी सुद्धा या सगळ्या प्रक्रियेकडे डोळसपणे बघितलं पाहिजे. वेळ आला तर आपला लढा हा आपल्याला उभारावा लागतो, आपल्याला उभारावा लागतो. हे काही आपल्याला नवं नाही. त्यांना जुळवूनच घ्यायचे नसेल तर आपला नाईलाज आहे, असा इशारा सिद्धार्थ मोकळे यांनी दिला. दरम्यान, वंचित बहुजन आघाडीच्या इशाऱ्यानंतर कॉंग्रेस नेते अतुल लोंढे यांनी याबाबतच्या चर्चांवर स्पष्टीकरण दिले आहे. इंडिया आघाडीत अजूनपर्यंत तरी कोणत्याही जागावाटपाची चर्चा झालेली नाही. सभा असतील, पुढच्या बैठका असतील हे पाच राज्यांच्या निवडणुका झाल्यानंतर त्याबाबत चर्चा होईल. समन्वय समिती आहे, हायकमांड आहे, वरिष्ठ नेते आहेत, या सर्व स्तरावर चर्चा होईल, कुणाकडे किती जागा दिल्या याबाबत चर्चा होणार आहे. त्यामुळे आज ज्या बातम्या सुरु आहेत त्या खोळसाडपणाच्या आहेत. आज ज्या गोष्टी घडतील त्याबाबत अधिकृत माहिती समोर येईल, अशी प्रतिक्रिया अतुल लोंढे यांनी दिली.

# भाऊबीजेनिमित्त संत मुक्ताईने परिधान केली ज्ञानदादाकडील साडीचोळी

आधुनिक केसरी न्यूज


दादासाहेब घोडके

पैठण : भाऊबीज सणानिमित्त जन्मस्थान माहेर श्री क्षेत्र आपेगाव संस्थान येथुन संत मुक्ताई संस्थानला सालाबाद परंपरेने साडीचोळी भेट देऊन भाऊबीज सण उत्साहात साजरा करण्यात आला.

बहीण आणि भावाच्या नात्याची वीण अधिक घट्ट करणारा सण म्हणजे भाऊबीज. कार्तिक शुद्ध द्वितीयेला भाऊबीज साजरी केली जाते. या दिवशी यम आपली बहीण यमुना हिच्या घरी भोजनास गेला, म्हणून या दिवसाला यमद्वितीया असे नाव मिळाले, अशी मान्यता आहे. दिवाळीतील महत्त्वाचा आणि शेवटचा सण म्हणजे भाऊबीज. याही वर्षी बहीण मुक्ताबाईस बंधू ज्ञानेश्वर महाराज व चारही भावंड जन्म संस्थान आपेगाव यांच्याकडील साडीचोळी भाऊबीजेच्या पर्वावर अभिषेक पूजनाने संत मुक्ताबाईस परिधान करण्यात आली. संत परंपरेत बहीण भावाचे नाते



जपणाऱ्या या भाऊबीज उत्सवाला पहाटे मोठ्या प्रमाणात भाविकांनी उपस्थिती लावली होती. दर वर्षी संत परंपरेत बहीण भावाचे नाते जपणाऱ्या या भाऊराया ज्ञानदादा कडून दिला जाणारा या साडी चोळी भेटीचा अमूल्य ठेवा मोठ्या सन्मानाने जपून ठेवला जातो. भाऊबीजेला संत मुक्ताई यांना मोठ्या भक्ती भावाने परिधान केला जातो. अध्यात्मविवेकी श्री. ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज आपेगावकर यांच्या स्नेहपल्लवे आशीर्वादातून जिजासाहेब मिसाळ व सौ.सुशीला मिसाळ, सुर्यकांत काळे, शैलाताई काळे, या दाम्पत्याच्या हस्ते मुक्ताईला ज्ञानदादाकडून आलेली साडीचोळी दरवर्षी परंपरेप्रमाणे याही वर्षी देण्यात आली. यावेळी मुक्ताई संस्थानचे अध्यक्ष रविंद्र पाटील, भागवत पाटील, शिवाजी महाराज खवणे, अप्पासाहेब मिसाळ, भीमराज गाढे, सौ. गाढे, प्रांजली मिसाळ, पंडितराव औटे, नारायण घुगे, बबन मोरे, अथर्व घोडके आदी भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते.





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

आपल्याकडे आपण राजाला दिवाळी काय माहिती असे म्हणतो. त्याचे कारण म्हणजे त्याच्याकडे नित्य दिवाळी असते. त्याला कुठल्याही गोष्टीची कमतरता कधी भासत नाही.

समाजातील दुर्बल घटकांच्या प्रती प्रेम, कृतज्ञता बाळगल्याने आणि दुसऱ्यांच्या आनंदात आपला आनंद मानल्याने आपलीही दिवाळी मजेत जाते. जसे पेरलेले धान्य अनेक पटींनी परत मिळते तसाच दुसऱ्यांना दिलेला आनंदही अनेक पटींनी आपल्याकडे परत येतो. निसर्ग, शेतकरी, पशुधन, आपल्याला वर्षभर सहकार्य करणारी सर्व माणसे या सगळ्यांची आठवण असू द्यावी. थोडक्यात म्हणजे देणाऱ्याचे हात आपण घ्यावे. अज्ञानाचा, वाईट विचारांचा, भेदभावाचा अंधःकार दूर करून ज्ञानदीप उजळावे ही शिकवण हा सण आपल्याला देतो. असे झाले तर राजाप्रमाणेच आपल्याकडेही नित्य दिवाळीच आहे ! कानडीने केला मऱ्हाठा भ्रतार । एकाचे उत्तर एका नये ।।असा जगद्गुरू तुकोबारायांचा एक अभंग आहे. एका कानडी स्त्रीने मराठी नवरा केला. ती काय बोलते ते नवऱ्याला समजेना आणि नवरा काय म्हणतो ते तिला समजेना. सगळाच सावळा गोंधळ ! ' एक दुजे के लिये ' हा हिंदी चित्रपट सगळ्यांना आठवत असेल. त्यात ती नटी हिंदी आणि तिचा प्रियकर तमिळ ! त्यांच्यातही अशीच गमतीदार परिस्थिती निर्माण होते. त्यांच्या भाषेतील मजेदार गोंधळ ' हम बने तुम बने एक दुजे के लिये ' या गाण्यात अतिशय मनोरंजक पद्धतीने दाखवला आहे आणि ते गाणं गायलही अतिशय सुंदर आहे ! लता मंगेशकर आणि एस पी बालसुब्रमण्यम यांनी हे गीत अजरामर केलं आहे. ' तुम हो बुद्दू जान लो, यु आर हँडसम मान लो...' हे ऐकताना आपल्याही चेहऱ्यावर हसू आल्याशिवाय राहत नाही. आपल्या मराठीच्या नगरीतही सध्या अशीच गोंधळाची परिस्थिती आहे. काय बरोबर आणि काय चूक हेच कळेनासं झालंय. इंग्लिश विंग्लिश मराठीत ' मिंग्लिश ' झालंय, तर कुठे हिंदीमुळे ' हिंग्लिश ' झालंय आणि तज्ज्ञांच्या ' टिंगलीस ' वाव मिळाला आहे.



## आनंदी पहाट

## संवादाद्वारे आपले नैपुण्य जपावे

आधुनिक केसरी

आपल्या राहणीमानात एकप्रकारे आपले व्यक्तिमत्व ऐट अणू शकते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

कल्पक आणि सौंदर्यपूर्ण सकारात्मक विचार, आचार आणि व्यवहार करणारे मन निश्चितच आपल्या जीवनात सौदर्याचा साक्षात्कार घडवून आणू शकते.

आपल्या प्रत्येकाच्या जीवनात खरी परीक्षा आपल्या धीराची, सचोटीची, मेहनतीची, हुशारीची, बौद्धिक कौशल्याची असते. आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर आपण नवीन परीक्षाच देत असतो. अनेकदा आपण देत असलेल्या आपल्या जीवनातल्या परीक्षा कळतही नाहीत. सहजपणे त्यामध्ये आपण चांगलं यश देखील मिळवून पुढे जातो. आयुष्यातील परीक्षांची भीती, दडपण आपल्याला अनेकदा जाणवत देखील नाही. पण ह्याचा अर्थ असा नसतो कि, आपण प्रत्येक परीक्षेत खूप मोठे यश संपादित करूच शकतो. आपले व्यक्तिस्वातंत्र्य हे आपापल्या विचारांपुरते मर्यादित राहिले तर ठीक, अन्यथा ते वर्तनांतून दिसायला लागते तेव्हा, काही अंशी, ते स्वैराचार करताना दिसायला लागते. प्रत्येक व्यक्तीच्या विचार, वर्तन आणि व्यवहारांत त्या व्यक्तीच्या संस्कृतीचे आणि प्रकृतीचे दर्शन होत असते; तर काही व्यक्तींच्या विकृतीचे प्रदर्शन होताना दिसते. व्यक्तीचे व्यक्त होणे हे व्यक्तीच्या वक्तव्यातून जसे कळत असते, तसेच ते वृत्तीतून देखील दिसते. विवाद करणे ही

देखील काहीअंशी एकप्रकारची विकृतीच असते, असे म्हंटले तर वावगे ठरणार नाही. सतत वाद घालणाऱ्या व्यक्तीला अनेकदा हे कळतच नसते, ती व्यक्ती व्यक्ती वाद-विवाद करत आहे कि, संवाद साधत आहे. विवादाने केवळ अशा व्यक्तीतील वैगुण्य दिसून येते परंतू जर त्याच व्यक्तीने संवाद साधला तर त्या व्यक्तीचे नैपुण्य जगासमोर येते. वैगुण्यामुळे नकारात्मक वातावरण निर्माण होत असते, तर नैपुण्याने सर्वांनाच आनंद प्राप्तीची अनुभूती येत राहते.



आधुनिक केसरी

## अद्वैती नाहला | आत्माराम ||

देखिला रे आम्ही | सगुणात देव ||
निर्गुणाचा ठाव | विटेवरी ||१||
गोपाळांच्या संगे | रमला श्रीरंग ||
तोचि पांडुरंग | वैष्णवांचा ||२||
वाजता मुरली | शुद्ध हरपली ||
आत्ममग्न झाली | वारीमध्ये ||३||
हरिनाम माझ्या | जीविचा जीव्हाळा ||
लावण्याची कळा | झळकली ||४||
गोकुळीचा राणा | पंढरीसी आला ||
अदवैती न्हाला | आत्माराम ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी

वेताळ खंकाळ लागला ।ब्रह्मगिऱ्हो संचरला ।
नेणों चेडा वोलांडिला ।कांहीं कळेना ॥२८॥
येक म्हणती बीरे देव ।येक म्हणती खंडेराव ।
येक म्हणती सकळ वाव ।हा ब्राह्मणसमंध ॥२९॥
येक म्हणती कोणें केलें ।आंगीं देवत घातले ।
येक म्हणती चुकलें ।सटवाईचें ॥३०॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

सन्तन महिमा को कहे, सन्त रुप भगवन्त ।
देव सदाफल वन्दिये, चरण कमल रज
सन्त ।।३४।।(स्वर्वेद तृतीय मण्डल अष्टम अध्याय) ०३/०८/३४

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
सन्त भगवंताचे स्वरुप आहेत. त्यांच्या महिमेचे वर्णन कोण करू शकेल ? आपल्या जीवन उद्धारासाठी त्यांच्या चरण-कमल-रज ची वंदना केली पाहिजे. ईश्वराची उपासना केल्याने त्यांचे कर्म, गुण आणि स्वभाव उपासकात येतात. अग्नीत तापवलेले लोखंड अग्नीस्वरूप होऊन जाते. त्याचप्रमाणे ईश्वराची भक्ती करता करता सन्त भगवंत स्वरूप होऊन जगात वावरतात. त्यांच्या चरणरजाने (चरण-धुलीने) संसार पवित्र होतो. म्हणून भक्तीची इच्छा करणारे आपला सर्व अभिमान सोडून त्यांच्या चरण-रज प्राप्तिने पूर्ण तृप्त होऊन कृत्कृत्य होतात.

....................................................................

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## काव्य-चरितावली

पुष्प ५२वे

आधुनिक केसरी

प्रभू श्रीरामाची कृपा होता । कठीण
कार्याची होते सिद्धता। मज आले हो हे
अनुभवता। म्हणे अरुणदास ।।१ ।।
महिमा सद्गुरुकृपेचा । प्रवास हा माझ्या
लेखणीचा । अखंड प्रवाही प्रतिभेचा ।
लिहिली जाती काव्यपुष्प ही ।।२।।
गोंदवल्यास श्रीमहाराज स्थिरावले ।
भक्तांचे येणे नित्य वाढू लागले । माय
गीताबाईचे मन संतोषले । पाहुनी वैभव
लेकाचे ।। ३ ।।
वयपरत्वे गीतामाय थकली । मनातली
ईच्छा ती बोलली । आता काशी यात्रा जर
मज घडली। होईल सार्थक देहाचे ।।४।।
ईच्छा आईची महाराजानी ऐकली ।
त्यांनी काशी यात्रेची तयारी सुरू केली ।
सोबतीची माणसे घेतली । आगगाडी ने
पोंचले ते काशीला ।। ५ ।।




अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

## नामस्मरणरूपी शेताची मशागत

आधुनिक केसरी

नामस्मरणरूपी शेतात उत्तम पीक येण्यासाठी प्रथमतः सदाचरणाची आवश्यकता आहे. सदाचरण हे शेताचे रक्षण करण्याकरिता लागणाऱ्या कुंपणासारखे आहे, म्हणून त्याचे महत्त्व आहे. दुसरी गोष्ट, शुद्ध अंतःकरण. शुद्ध अंतःकरण म्हणजे उत्तम काळी भुसभुशीत जमीन. या जमिनीमधले दगड, हरळी वगैरे काढून ती साफ करावी; म्हणजेच, अंतःकरणात कोणाबद्दलही द्वेष, मत्सर, वगैरे ठेवू नये. शुद्ध अंतःकरणानंतर नामस्मरणाचे महत्त्व आहे. नामस्मरण हे त्या जमिनीत पेरण्याचे बी आहे. हे बी किडके नसावे; म्हणजे, नाम सकाम नसावे. उत्तम बी म्हणजे ' नामाकरिताच नाम ' हे आहे. त्यानंतर तीर्थयात्रा, संतांचे आशीर्वाद, त्यांची कृपादृष्टी, यांची आवश्यकता आहे. या सर्व गोष्टी पाटाच्या पाण्यासारख्या आहेत. यामुळे शेत चांगले यायला मदत होते. शेवटची महत्त्वाची गोष्ट म्हणजे भगवत्कृपा होय. भगवत्कृपा ही पावसाच्या पाण्यासारखी आहे. पाटाच्या पाण्यापेक्षा पावसाच्या पाण्याची गोष्ट काही और आहे. पण तो पडणे न पडणे आपल्या हाती नाही.



शेताला लावण्याकरिता पाटाचे पाणी एखादी विहीर, तलाव किंवा नदी यांमधून नेता येणे शक्य असते; परंतु पावसाच्या बाबतीत कोणाला काहीच करता येत नाही. त्यामुळे एखाद्याने शेताची उत्तम निगा राखली, उत्तम बी पेरले, तरी पावसाच्या अभावी पीक न येण्याचा संभव असतो.

नामस्मरणरूपी शेताचे एक वैशिष्ट्य आहे. ते हे की, त्याच्या अंगी लोहचुंबकासारखी आकर्षकशक्ती आहे. म्हणून हे शेत भगवत्कृपारूपी पाऊस खेचून घेऊन स्वतःवर पाडते, त्यामुळे पावसाच्या अभावी शेत वाया गेले असे कधीच होत नाही. आपण असे पाहू की, दोन शेतकरी आहेत; एक कर्तव्यकर्म म्हणून वेळ झाली की आपल्या शेताची मशागत करणारा आहे, तर दुसरा आळशी म्हणजे मशागत न करणारा आहे. आता जेव्हा पाऊस पडेल तेव्हा, ज्याने मशागत केली त्याचे शेत उत्तम वाढेल, पण दुसऱ्याचे वाढणार नाही. भगवंताच्या कृपेने जो पाऊस पडणार, त्याचा एकाला फायदा मिळेल; तो दुसऱ्याला मिळणार नाही. म्हणजे जो नियम प्रपंचात लागू तोच नियम परमार्थात लागू. भगवंताची कृपा सर्वांवर सारखाच वर्षाव करीत असते. ज्याने ज्या प्रमाणात चित्तशुद्धी केली असेल, त्या प्रमाणात त्याला फायदा होईल, दुसऱ्याला नाही होणार. भगवंत किंवा संत समदृष्टी असतात ते असे. भगवंत निःपक्षपाती आहे. त्याच्यापाशी कोणताही भेद नाही. आपण तयार झालो की त्याची कृपा आपोआप होते. कृपेला योग्य अशी भावना तयार करणे आपले काम आहे. संतांनी नुसते आपल्याला सांगून भागत नाही, आपण काय करायला पाहिजे हे कळून आपण ते स्वतः करायला पाहिजे. त्यांच्या ठिकाणी जर विषमता दिसली तर तिचा उगम किंवा कारण आपल्यातच आहे हेच यावरून दिसते.

## समर्थ रामदास

आधुनिक केसरी

केल्याने होत आहे रे । आज आपल्या जीवनात अपयश आणि दुःख दिसत असेल, तर त्याला आपले अधीर आणि उतावीळ मन कारणीभूत आहे. बहुसंख्य लोक आज सुख, आंनद, यश, कीर्ती, ऐश्वर्य, अधिकार मिळवण्यासाठी अधीर आणि उतावीळ झाले आहेत. परंतु त्यासाठी शांतपणे आणि सातत्याने कराव्या लागणाऱ्या परिश्रमाचा अभाव दिसून येत आहे. आपल्या हिंदुस्थानी संस्कृतीत विद्या, कला अथवा

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

गुरूवार, १६ नोव्हेंबर २०२३

adhunikkesari.com Adhunik Kesari







# बिरसा मुंडा जयंतीनिमित्त गरजू महिलांना शिलाई मशिन वाटप

आधुनिक केसरी न्यूज



**लोणार :** बहुल आदिवासी असलेले गावं टिटवी या ठिकानी क्रांती सूर्य बिरसा मुंडा यांच्या १४८ व्या जयंती निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाचे अध्यक्ष लक्ष्मन घाटे होते. यावेळी या कार्यक्रमात क्रा. बिरसा मुंडा यांचे जीवनचरित्र त्यांच्या जीवनावर प्रकाश टाकण्यात आला बिरसा मुंडा वयाच्या १६ व्या वर्षापासून आदिवासी वर होणाऱ्या अत्याचाराविरूद्ध दंड थोपटले तसेच उलगुलान जारी है व जंगलामध्ये५-१० वस्तीच्या घरापर्यंत जाऊन जनजागृती केली. इंग्रज, सावकार आणि उद्योगपती यांच्या तावडीतून आदिवासींची सुटका केली व त्यांचा मध्ये जनजागृती करून उठाव केला त्यामुळे इंग्रजांनी बिरसा मुंडा यांना तुरुंगात टाकले आणि त्यांचा अमानुष छळ केला व विषारी इंजेक्शन देऊन त्यांची जीवन यात्रा संपवली. कोणत्याही कैद्याचा पुतळा तुरुंगात नसतो परंतु बिहार राज्यात तिहार जेल मध्ये त्यांचा पुतळा आजही आहे. तसेच आदिवासी बांधवांनी समजाच्या होणाऱ्या प्रत्येक कार्यक्रमात एकजूट ठेवावी, असे आव्हान आदिवासी बांधवांना भगवानराव कोकाटे यांनी केले. आदिवासी समाजावर अन्याय, अत्याचार होतात तर आपण गप्प बसून चालणार नाही तसे घडल्यास आदिवासी महिला आवाज उठवल्या शिवाय राहणार नाही असे मत मा.जिल्हा परिषद सदस्या सौ गोदावरी ताई कोकाटे यांनी मांडले तसेच गणेश राऊत व सोपान डोळे यांनी सुधा जयंती निमत्त आपले विचार व्यक्त केले. या कार्यक्रमात २लाभार्थ्यांना शिलाई मशीन वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला उपस्थित प्रमूख पाहुणे भगवानराव कोकाटे जिल्हाध्यक्ष बिरसा क्रांती दल बुलढाणा ,संचालक कृषि उत्पन्न बाजार समिती, मा. जिल्हा परिषद सदस्या सौ. गोदावरी भगवान कोकाटे आणि त्यांच्यबरोबर ग्रा. पं.सरपंच अनुसया नरवाडे, सचिव एन. पी. तेजनकर, सदस्य दामोधर तनपुरे, पंढरी कोकाटे मुरली कुटे, परसराम कोकाटे, गेंदु राऊत, ज्ञानेश्वर डोळे, देवानंद नरवाडे,सतीश कोकाटे,संजय कोकाटे, एकनाथ घाटे, पवन कोकाटे दामोदर तनपुरे पंढरी धोंडू कोकाटे, फकिरा तनपुरे, वेजीनाथ तनपुरे पंढरी जाधव उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी सुनिल जीवन इंगळे, गणेश कोकाटे, श्याम तनपुरे , भगवान नामदेव कोकाटे संतोष राऊत यांनी परिश्रम घेतले.

# नाशिकमध्ये फटाके उडवण्याच्या वादातून २८ वर्षीय तरुणाची हत्या

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** पाथर्डी गाव भागातल्या स्वराज्य नगर या ठिकाणी पाडव्याच्या दिवशी म्हणजेच १४ नोव्हेंबरच्या रात्री साडेअकरा वाजता एका तरुणाची हत्या करण्यात आली. फटाके उडवण्याच्या वादातून गौरव तुकाराम आखाडे या २८ वर्षीय तरुणाची हत्या करण्यात आली. या घटनेमुळे इंदिरा नगर भागात एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी पोलिसांनी दोन ते तीन संशयितांना ताब्यात घेतलं आहे. तसंच इंदिरा नगर पोलीस ठाण्यात या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार फटाक्यांवरुन गौरव तुकाराम आखाडे आणि गणेश शिंदे, बबन शिंदे, नारायण शिंदे आणि इतर यांच्यात आधी फटाक्यांवरुन वाद झाला. त्याबाबतची तक्रार इंदिरा नगर पोलीस ठाण्यात दाखल झाली होती. पाडव्याच्या दिवशी पुन्हा एकदा या सगळ्यांमध्ये वाद झाला आणि गौरववर धारदार शस्त्राने वार करण्यात आले. या घटनेत गौरवचा मृत्यू झाला आहे. काही आरोपींना आम्ही ताब्यात घेतलं आहे तर पुढील तपास चालू आहे असं पोलीस आयुक्त मोनिका राऊत यांनी माध्यमांना सांगितलं आहे. मंगळवारी ही घटना घडल्याचं समोर येताच पोलीस घटना स्थळी दाखल झाले. पोलिसांनी संशयितांना ताब्यात घेतलं असून या प्रकरणी पुढील तपास सुरु असल्याचं स्पष्ट केलं. इंदिरा नगर पोलीस या प्रकरणी पुढील तपास करत आहेत. ऐन दिवाळीच्या उत्साहात नाशिकमध्ये हत्येची घटना घडल्याने इंदिरा नगर परिसर हादरला आहे.

दोन दिवसांपूर्वी गोंदियामध्येही एक हत्येची घटना घडली. वाहनाला कट मारल्याच्या रागातून अर्पित उके या तरुणाचा खून करण्यात आला. या प्रकरणीही आरोपींचा शोध पोलीस घेत आहेत.

# व्हेल माशाच्या पिल्लाला समुद्रात सोडले

आधुनिक केसरी न्यूज

**रत्नागिरी :** जिल्ह्यातील गणपतीपुळे समुद्रात अडकलेल्या व्हेल माशाच्या पिल्लाला अखेर ४० तासांनी समुद्रात सोडण्यात यश आलं आहे. गेल्या ४० तासांपासून सरकारच्या विविध यंत्रणा व्हेल माशाच्या पिल्लाला जीवदान मिळण्याकरता प्रयत्न करत होते. तसंच, पर्यटक आणि ग्रामस्थांनीही शर्थीचे प्रयत्न केले. अखेर त्यांच्या प्रयत्नांना यश आले असून व्हेल माशाला जीवदान मिळाले आहे. सोमवारी (१३ नोव्हेंबर) समुद्राला ओहोटी असल्याने व्हेल मासा गणपतीपुळे समुद्र किनाऱ्यावर आल्याचे पर्यटकांनी पाहिले. तसंच, बोटक्लबच्या सदस्यांनाही हा व्हेल मासा दिसला. त्यामुळे त्यांनी तातडीने पावले उचलत त्याला समुद्रात सोडण्यासाठी प्रयत्न सुरू केले. परंतु, महाकाय व्हेल माशाचं पिल्लू वाळूत रुतून बसले होते. सोमवारपासून पर्यटक, स्थानिक नागरिक, तज्ज्ञ, एमटीडीसीचे अधिकारी, वनविभागाचे अधिकारी आणि जीव रक्षक यांच्या मदतीने या माशाला समुद्रामध्ये खेचण्याचा प्रयत्न केले जात होते. वीस फुटांहून अधिक लांब आणि पाच ते सहा टन इतके या माशाचे वजन आहे. दरम्यान ओहोटी असल्यामुळे सध्या रेस्क्यू ऑपरेशनला अडथळे येत आले. हे बचावकार्य रात्रभर सुरू होते. रात्री ओहोटीच्या वेळी या माशाला दोरीने बांधलं आणि बोटीने ओढून खोल समुद्रात नेण्यात आलं. अखेर, ४० तासांहून अधिक काळ प्रयत्न केल्यानंतर या व्हेल माशाच्या पिल्लाला खोल समुद्रात सोडण्यात आलं आहे. यामुळे ग्रामस्थांसह सर्वांनी सुटकेचा निश्वास सोडला.

# अद्वय हिरे यांना बँक कर्ज घोटाळ्याप्रकरणी अटक

आधुनिक केसरी न्यूज

**मालेगाव :** येथील रेणुकादेवी सहकारी सूतगिरणी उभारणीसाठी नाशिक जिल्हा बँकेकडून घेतलेल्या कर्ज रकमेत घोटाळा केल्याप्रकरणी दाखल असलेल्या गुन्ह्यात शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे उपनेते अद्वय हिरे यांना अखेर अटक झाली आहे. उच्च न्यायालयाने अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळल्यानंतर पोलीस हिरे यांच्या मागावर होते. त्यानुसार बुधवारी पहाटे भोपाळ येथून नाशिक पोलिसांच्या गुन्हे शाखेने त्यांना ताब्यात घेतले आहे. येथील द्याने भागात उभारण्यात आलेल्या हिरे कुटुंबियांशी संबंधित सूतगिरणीसाठी १० वर्षापूर्वी नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून सात कोटी ४३ लाखाचे कर्ज घेण्यात आले होते. या कर्जाची परतफेड न झाल्याने ३१ कोटीच्यावर थकबाकीची रक्कम गेली. कर्जफेड न झाल्याने बँकेने सूत गिरणीची तारण मालमत्ता जप्तीची कारवाई केली. तेव्हा प्रकल्पाचे बांधकाम आणि यंत्रसामुग्री हे आराखड्यानुसार नसल्याचे तसेच सूत गिरणीसाठी घेतलेल्या कर्जाची रक्कम हिरे कुटुंबाशी संबंधित व्यंकटेश सहकारी बँकेत वळती करण्यात आल्याची बाब बँकेच्या निदर्शनास आली. त्यामुळे गेल्या मार्च महिन्यात येथील रमजानपुरा पोलीस ठाण्यात या दोन्ही संस्थांच्या संचालकांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. मालेगाव येथील रेणुकादेवी सहकारी सूतगिरणी उभारणीसाठी नाशिक जिल्हा बँकेकडून घेतलेल्या कर्ज रकमेत घोटाळा केल्याप्रकरणी दाखल असलेल्या गुन्ह्यात शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे उपनेते अद्वय हिरे यांना अखेर अटक झाली आहे. उच्च न्यायालयाने अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळल्यानंतर पोलीस हिरे यांच्या मागावर होते.



**नायगाव मतदार संघातील युवा नेते नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक कैलासभाऊ गोरठेकर यांच्या वतीन उमरी शहरातील तहसील जवळील गरीब वस्तीत जाऊन साड्या फराळ वाटप करण्यात आला. हिंदू धर्मातील सर्वात मोठा सन सम्पूर्ण जगभरात मोठ्या उत्साहात साजरा करतात. गरीबाची दिवाळी होत नाही म्हणून युवा नेते कैलासभाऊ गोरठेकर यांनी स्वता कपडे व फराळ देऊन सण साजरा करून देण्यात आला. यावेळी उपनगराध्यक्ष प्रवीणभाऊ सारडा, पपू पाटील, करेगावकर, रामेश्वर सावंत, राजेश मनूरकर, गोवर्धन ढगे, सचिन कवळे, अवधूत मनुरकर, सदाशिव मंत्रिवाड, माऊली सावंत, गजानन लाकडेवाड, नागेश बटेवाड, राजू सवई याच्यासह उमरी तालुक्यातील अनेक जन उपस्थित होते.**

## पण नोकऱ्या कुठे आहेत ?

आधुनिक केसरी

बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी जातनिहाय सर्वेक्षण केल्यानंतर राज्यातील आरक्षणाची मर्यादा वाढवून, ती ६५ टक्क्यांवर नेण्यात आली. सरकारी नोकरी आणि शैक्षणिक क्षेत्रासाठी असलेली ५० टक्क्यांची मर्यादा ६५ टक्के करण्यासाठी विधेयकही मंजूर करण्यात आले. जातनिहाय सर्वेक्षणातून नितीश कुमार यांनी राजकीय गणिते आखली असली तरी याच सर्वेक्षणामुळे त्यांच्यासमोर आव्हानेही निर्माण झाली आहेत. २ ऑक्टोबर रोजी जाहीर झालेल्या सर्वेक्षणाच्या अहवालामध्ये राज्यातील किती लोकांकडे सरकारी नोकरी आहे, याची तपशीलवार माहिती उघड झाली आहे. बिहारमधील १३.०७ कोटी जनतेपैकी फक्त १.५ टक्के लोकांकडे (जवळपास २०.४९ लाख) सरकारी नोकरी आहे. एकूण लोकसंख्येपैकी सरकारी नोकरी असण्याचे प्रमाण नगण्य असल्यामुळे आता नितीश कुमार यांच्यासमोर सरकारी नोकऱ्या उपलब्ध करून देण्याचे आव्हान उभे राहिले आहे. सर्वेक्षणामध्ये सरकारी नोकरदारांचा आकडा तर मिळाला आहेच; पण त्याशिवाय या नोकरदारांमध्ये कोणत्या जातीचे किती लोक आहेत? याचीही माहिती उघड झाली आहे. राज्यातील १५.५ टक्के जनता खुल्या प्रवर्गात मोडते. या खुल्या प्रवर्गातील ३१.२९ टक्के लोकांकडे सध्या सरकारी नोकरी असल्याचे उघड झाले आहे. बिहारमध्ये ओबीसी प्रवर्गातील लोकसंख्या २७.१२ टक्के असून, त्यापैकी केवळ १.७५ टक्के लोक सरकारी नोकरीमध्ये आहेत. अनुसूचित जातींची लोकसंख्या १९.६५ टक्के; तर अनुसूचित जमातींची लोकसंख्या १.६८ टक्के एवढी आहे. या प्रवर्गातून अनुक्रमे १.१३ टक्के व १.३७ टक्के लोक सरकारी नोकरीमध्ये असल्याचे या सर्वेक्षणातून समोर आले आहे. 'अत्यंत मागासवर्गीय समाज' राज्यात सर्वांत मोठ्या संख्येने आहे. लोकसंख्येनुसार त्यांची संख्या ३६.०१ टक्के एवढी आहे. मात्र, सरकारी नोकरीमध्ये त्यांचे प्रमाण सर्वांत कमी असून, ते एक टक्क्याच्याही खाली ०.९८ टक्के इतके आहे. मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी २०२२ मध्ये स्वातंत्र्यदिनी केलेल्या भाषणात २०२५ च्या विधानसभा निवडणुकीआधी राज्यात १० लाख सरकारी नोकऱ्या देणार, असे आश्वासन दिले होते. मात्र, अद्याप तरी सरकारी नोकरभरतीचा कार्यक्रम जाहीर झालेला नाही. सरकारने आतापर्यंत १.२२ लाख शिक्षकांची नोकरभरती केली असून, १.२२ लाख पदे आणखी भरणार असल्याचे जाहीर केले आहे. उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव यांनीही सरकारी नोकरभरती करण्याबाबत वारंवार विश्वास व्यक्त केला आहे. "आमचे वचन पूर्ण करण्यासाठी आम्ही वेगाने प्रयत्न करीत आहोत. स्वयंरोजगाराला चालना देण्यासाठी सरकारकडून अनुदान आणि प्रोत्साहन देणाऱ्या रोजगार योजना राबविल्या जात आहेत. बिहार सरकारने जातनिहाय सर्वेक्षण केल्यानंतर सरकारी नोकरी आणि शैक्षणिक क्षेत्रातील आरक्षण ५० टक्क्यांवरून ६५ टक्के केले आहे.

## पर्यावरणाची कास धरत निसर्गाला प्राधान्य हवे !

आधुनिक केसरी

**देशाच्या आर्थिक राजधानीतील प्रदूषणावरून उच्च न्यायालयाने मुंबई मनपा आणि संबंधित यंत्रणांना फटकारले. मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणी बैठक घेऊन सूचना केल्या आहेत. वाढत्या प्रदूषणावर मात करण्यासाठी राज्याच्या मुख्यमंत्री महोदयांनी केलेल्या सूचना म्हणजे प्रदूषणाला मागे रेटण्यासाठी त्याच्याविरुद्ध घोषित केलेले युद्धच होय. या युद्धात टँक म्हणजे रणगाड्यांच्याऐवजी तब्बल एक हजार पाण्याचे टँकर उतरवण्याची सूचना लक्षवेधी आहे. रस्ते धुण्यासाठी पाण्याच्या टँकरचा उपयोग होणार आहे. या निमित्ताने कोरोना काळाची आठवण झाली. जगभरात कोरोनाचा तीव्र प्रादुर्भाव होता. भारताच्या पंतप्रधान महोदयांनी थाळ्या - टाळ्या वाजवण्याचे नागरिकांना आवाहन केले होते. त्यास लोकांतून चांगला प्रतिसाद मिळाला. टाळेबंदीने घरात कोंडले गेलेल्यांना तितकाच एक विरंगुळा होता.**

यामध्ये अनेक नागरिकांनी सहभाग घेतला. काही अतिउत्साही तर रस्त्यावर येऊन ढोल वाजवत मिरवणुका काढत होते. एकंदरीत या प्रकारात लोकांचा सहभाग होता. रस्ते धुण्याच्या संदर्भात याचा विचार केला तर यात कंत्राट दिलेल्या संबंधित आस्थापनाच्या कामगारांचा रस्त्यांवर पाणी मारण्यात सहभाग असेल. तेव्हा कोरोना होता आता वायू प्रदूषण आहे.

रस्त्यावर पाणी मारल्यावर धूळ उडत नाही. हे मान्य. पण पाणी सुकल्यावर पुन्हा तिथे धूळ असणारच आहे. कित्येक दुकानदार दुकानासमोरील कचरा काढून झाल्यावर रस्त्यावर पाणी मारतात. रस्त्यावर पाणी असे पर्यंतच धुळीपासून दिलासा असतो. नंतर पुन्हा 'येरे माझ्या मागल्या.' आजपर्यंत असे अनेकांनी पाहिलेले आहे. हे झाले लहान स्तरावरील उदाहरण जे प्रतिदिन पाहण्यास मिळते. यासाठी नळाला उपलब्ध असणारे पाणीच सरसकट उपयोगात आणले जाते. ते बोअरवेल, रिसायकलचे आहे का ? इतका विचार केला जात नाही.

पंतप्रधान महोदयांच्या कोरोना काळातील आवाहनाचा धागा पकडत राज्याच्या मुख्यमंत्री महोदयांनी नागरिकांना रस्ते पाण्याने स्वच्छ करण्यासाठी पुढे येण्याचे आवाहन केल्यास नागरिक पुढे येतीलही. त्यात पंतप्रधान महोदयांनी आवाज दिल्यास ही संख्या अधिक असू शकेल. हा झाला जर तरचा भाग. कोरोना काळात सर्वच घरी होते आता प्रत्यक्षात नोकरी - व्यवसाय चालू आहेत. त्यामुळे संख्येवर परिणाम होऊ शकतो. नागरिकांना सहभागी करून घ्यायचेच असेल तर शनिवार - रविवारचा विचार होऊ शकतो.

रस्ते पाण्याने स्वच्छ करण्यासारखी वरवरची उपाययोजना तर्कशून्य आहे. त्यात तर्कशुद्धता आणण्यासाठी धुळीच्या मुख्य उगमस्थानांचा गांभीर्याने पक्का बंदोबस्त करावा लागेल. जो होण्यात कुचराई होत आली आणि परिणामी आज पाण्याने रस्ते स्वच्छ करण्याची घोषणा करण्याची नामुष्की ओढवून घेण्यात आली. अगदी मुंबईच्या प्रवेशद्वारावर गाड्यांची चाके धुण्याची योजनाही आहे. हे प्रत्यक्षात करायचे तर तिथे किती ट्रॅफिक होईल आणि त्यामुळे वाहनांतून बाहेर पडणाऱ्या पेट्रोल - डिझेलच्या धुरामुळे किती प्रदूषण वाढेल ? याचा विचार कुठे आहे? एकच रस्ता कित्येकदा खोदून पुन्हा बांधला जातो, याचा काही पत्ताच नाही. गटारे बांधतानाही असेच केले जाते. मेट्रोची कामे कूर्मगतीने मार्गक्रमण करत आहेत. ही कामे चालू असताना त्या ठिकाणी सरकारी मार्गदर्शक तत्त्वांचे पालन होत आहे का ? याविषयी वेळोवेळी पाहणी होते का ? पालन होत नसेल तर दोषींवर कडक कारवाई करण्याची तसदी घेतली जाते का ? या सर्व प्रश्नांची उत्तरे काय आहेत ?

मुंबई - ठाणे - नवी मुंबई येथे इमारतींची कामे जोरात चालू आहेत. अशा ठिकाणी कातळ (दगड) लागल्यावर तो फोडण्यासाठी मशीनला टोकेरी भाग बसवला जातो. जेणेकरून दगड पटकन फुटतील. हे चालू झाल्यावर परिसरातील लोकांना त्या 'टकटक' रूपी आवाजाचा प्रचंड त्रास होतोच. जोपर्यंत ते काम चालते तोपर्यंत दगड फोडताना धूळही उडत राहते. दगड ट्रकमध्ये भरताना पुन्हा धूळ उडते. अशा वेळी खिडक्या लावून घेण्याला पर्याय नसतो. सांगण्याचे तात्पर्य हेच की, बांधकाम म्हटले की धूळ उडणे आलेच. पण पाणी मारून मग कामास सुरवात करण्याचे सौजन्य कोणीही विकासक, कंत्राटदार दाखवत नाही. त्यामुळे इमारत बांधून पूर्ण होईपर्यंत नाका - तोंडात धूळ जाऊन शरीरात काय होत असेल ? याचा केवळ विचारच केलेला बरा. इमारतींचे बांधकाम करणारे विकासक पाण्याच्या उपयोगाविषयी अत्यंत उदासीन असतात. बांधकाम केलेल्या भागावर पाणी मारल्याने ते अधिक पक्के होते, त्याला तडे जात नाहीत आणि पुढे जाऊन रहिवाशांना वरच्या मजल्यावरून गळती होत आहे अशी ओरड करण्याची आवश्यकता भासत नाही. हे सर्व माहिती असूनही पाण्याचा उपयोग जेमतेमच होत असतो. म्हणजे जेवणात लोणच घ्याव तितकाच. रस्ते - गटारे - नाले बांधणारे, मेट्रोची कामे करणारेही याच पठडीत येतात. यांना एकाच माळेचे मणी म्हणणे उपयुक्त राहील. अशी माणसे सरकार, प्रशासन यांनी पाण्याच्या उपयोगा संदर्भात सूचना दिल्या तरी स्वतःला हवे तेच करतात. अगदी पाणी मुबलक प्रमाणात उपलब्ध असले तरी पाण्याच्या उपयोगाविषयी असलेला आळस कैक जणांना त्रासदायक ठरतो. याच्याशी अशांना देणेघेणे नसते. पैसा कमावणे या हेतूसमोर प्रामाणिकपणाला लाथाडले जाते आणि थुकपट्टीला जवळ केले जाते. पुन्हा हीच मंडळी देखभालीचे काम मिळण्यासाठी हात पसरायला तयार असतात. कामाची डेडलाईन ( नियोजित वेळ ) गाठण्यासाठी धावपळ होत असते. कारण सर्वांनाच विकास हवा आहे. पण तो होत असताना शरीरात काय जाते ? आणि त्याचे दुष्परिणाम काय ? याचा विचार करायला कोणालाही वेळ नाही. तो विचार आजारी पडल्यावरच होतो आणि तेव्हा शरीराचा खुळखुळा झालेला असतो. शरीराला या वेळी कदाचित प्राणवायूचा पुरवठा करावा लागण्याची पाळी येते.

बोअरवेल, रिसायकल करण्याजोग्या पाण्याचा उपयोग रस्ते स्वच्छ करण्यासाठी केला जाईल, असे मुख्यमंत्री म्हणाले आहेत. बोअरवेलचे पाणी म्हणजे भूगर्भातील जलसाठ्याचा उपयोग करणे होय आणि रिसायकल करणारे पाणी म्हणजे नेमके कुठले पाणी ? वर्तमान स्थितीत अनेकांकडे धुलाई यंत्रे आहेत. त्यात कपडे धुण्यासाठी पुष्कळ पाणी लागते. अर्थातच असे पाणी हे कपडे धुण्याच्या पावडरने मिश्रित असते. त्यामुळे रस्त्यावर असे पाणी ओतणे म्हणजे रस्त्यावरून चालणाऱ्या लोकांचे थोबाड फोडण्यासाठी वाव करून देणे होय. चाळींत राहणाऱ्या रहिवाशी मंडळींना याचा उत्तम अनुभव आहे. कारण कपडे धुण्याच्या साबणाचे पाणी बुळबुळीत असते. त्या पाण्यावरून घसरून पडल्याने किंवा तशी शक्यता असल्याने वादाचे प्रसंग घडतात. यात स्वच्छता राहते बाजूला वाद मिटवताना नाकीनवू येतात आणि अनिश्चित कालावधीसाठी अबोला धरला जातो. समस्यांचा ढीग साचत आहे. कचरा, वायू, जल प्रदूषण यांनी धोक्याची पातळी ओलांडून माणसाला पूर्णपणे आपल्या कह्यात घेतले आहे. मोकळ्या वातावरणात श्वास घेण्यासाठी गावी मुक्काम ठोकून राहणे नोकरी - व्यवसाय - शिक्षण यांच्यामुळे शक्य नाही. मग उरले काय ? तर गॅस चेंबरमध्ये रूपांतर झालेल्या महानगर, शहरांत दिवस ढकलत राहाणे. चांगले राहणीमान म्हणजे उंची कपडे, वाहन, मालमत्ता, दागिने इत्यादी इतकेच नाही. तर स्वच्छ आणि प्रदूषण मुक्त वातावरणात चार घास सुखाचे खाऊन निवांतपणे राहता येणे होय. यालाच शहरवासीय मुकत आहेत. आता परिस्थिती अशी झाली आहे की, बंदरातून जहाज निघून ते समुद्रात मध्यभागी पोचले आहे. तिथून मागे पुन्हा बंदर गाठण्याची मानसिकता नाही.

कृत्रिम पाऊस, टँकरने पाणी स्वच्छता या सर्वांसाठी गलेलठ्ठ रक्कम खर्च करावी लागणार आहे. यात संबंधित आस्थापणे गब्बर होतील. कारण त्यांना प्रदूषणमय स्थितीत अचानक लॉटरीच लागणार आहे. एकाबाजूला रस्ते पाण्याने धुण्याची वेळ आली आहे तर दुसऱ्याबाजूला राज्यातील दुष्काळ स्थिती घोषित केलेल्या ४० तालुक्यांच्या व्यतिरिक्त उर्वरित ७५ टक्क्यांपेक्षा कमी पाऊस झालेल्या ९५९ महसुली मंडळांत दुष्काळ सदृश्य परिस्थिती घोषित झाली आहे. तिथे आतापासूनच टँकरने पाणी पुरवठा करावा लागणार अशी स्थिती वाटते.

पाणी हेच जीवन आहे आणि रस्ते स्वच्छ करण्यासाठी त्याचा उपयोग करण्याची वेळ येणे दुर्दैवी आहे. मुंबई आणि परिसरातील भागांत पावसाने अचानक हजेरी लावली आणि त्याने मुंबई आणि सभोवतालचा काही भाग स्वच्छ केला. ही झाली निसर्गाची स्वच्छता करण्याची पद्धत. अर्थातच हे सर्व दिवाळी निमित्त व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकांसाठी नुकसानदायी ठरले. पण आता अशी स्थिती आहे की, सगळीकडेच फाटले आहे. त्यात ढिगळ लावणार तरी कुठे कुठे ? श्वास घेण्यायोग्य हवा पाहिजे की पाणी. अशी स्थिती आहे. खरतर दोन्हीही महत्त्वाचे. इकडे आड आणि तिकडे विहीर अशा कचाट्यात सापडायला झाले आहे इतकी मुंबईची 'धूळ'धाण उडाली आहे. आपल्या शहरांची मुंबई होऊ देऊ नका असे कोणी म्हटल्यास वावगे वाटू नये. यासाठी कायम निसर्गाची कास धरा. प्रथम पर्यावरण नंतर सर्वकाही.

जयेश राणे
8169240245



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

## भूदान चळवळीचे प्रवर्तक आचार्य विनोबा भावे

आधुनिक केसरी

**थोर गांधीवादी नेते भूदान चळवळीचे प्रवर्तक आचार्य विनोबा भावे यांची १५ नोव्हेंबर रोजी ४१ वी पुण्यतिथी होती. कोकणातील रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील गोगादे या छोट्या गावात ११ सप्टेंबर १८९५ रोजी त्यांचा जन्म झाला. त्यांचे मूळ नाव विनायक नरहर भावे असे होते. आचार्य ही त्यांना मिळालेली पदवी आहे. त्यांचे मूळ गाव सातारा जिल्ह्यातील वाई हे आहे. त्यांच्या अनेक पिढ्यांचे वास्तव्य वाई येथे होते. तिथे त्यांचे आजोबा आणि आईने त्यांच्यावर धर्मपरायणतेचे संस्कार केले. वाई मुक्कामी विनोबा भावे यांनी स्वामी केवलानंद सरस्वतीच्या चरणांशी उपनिषदे, ब्रह्मसुत्रे, शंकरभाष्ये व पतांजलीचे शिक्षण घेतले. पुढे नोकरीनिमित्त त्यांचे वडील बडोदा येथे गेले. तिथेच त्यांचे माध्यमिक व उच्च शिक्षण झाले.**

तिथे त्यांनी संस्कृत, फ्रेंच भाषेचा आणि इतर अनेक ग्रंथांचा अभ्यास केला. १९१६ साली महाविद्यालयीन इंटरची परीक्षा देण्यासाठी ते मुंबईला निघाले. पण वाटेतच सुरतेस उतरुन आई वडिलांना न कळवता ते वाराणसी येथे निघाले. त्यांना दोन गोष्टींचे आकर्षण होते हिमालय आणि बंगालचे सशस्त्र क्रांतिकारक. वाराणसी येथे हिंदू विश्वविद्यालयात त्यांनी महात्मा गांधींचे भाषण ऐकले आणि त्या भाषणाचा त्यांच्यावर खोल परिणाम झाला. हिमालयातील अध्यात्म आणि बंगालमधील क्रांती या दोन्हींच्या प्रेरणा त्यांना महात्मा गांधींच्या उक्तीत आणि व्यक्तिमत्वात आढळल्या. ७ जून १९१६ रोजी कोरचब आश्रमात त्यांनी गांधीजींची भेट घेतली. या भेटीतच त्यांनी ब्रह्मचार्यांची शपथ घेतली आणि जीवनसाधनेस सुरवात केली. तिथे ते सूतकताई शिकले. १९२१ रोजी जमनालाल बजाज यांनी साबरमती आश्रमाची शाखा वर्ध्यास काढली तिचे संचालक म्हणून ८ एप्रिल १९२१ रोजी त्यांनी जबाबदारी स्वीकारली. भगवत गीतेचे सार त्यांनी अत्यंत सोप्या आणि रसाळ शैलीत गीताई आणि मधुकर या ग्रंथातुन मांडले. त्यांचे सर्वात मोठे कार्य म्हणजे भूदान चळवळ. मोठ्या जमीनदारांकडून जमीन घेऊन त्यांनी त्या भूमिहीनांना दिल्या. भूदान आंदोलनासाठी त्यांनी देशभर यात्रा काढली. गरिबांच्या कल्याणासाठी त्यांनी सर्वोदय योजना सुरू केली. १९३०-३२ च्या कायदेभंग चळवळीत कारावास भोगलेले विनोबा भावे महात्माजींच्या १९४०



च्या वैयक्तिक सत्याग्रहाचे गांधींनी निवडलेले पहिले सत्याग्रही होते.

दिनांक १५ नोव्हेंबर १९८२ रोजी सकाळी ९.४० वाजता पवनार येथे परंधाम आश्रमात सतत सात दिवस प्रायोपवेशन करून भूदाननेते आचार्य विनोबा भावे यांनी वयाच्या ८७ व्या वर्षी प्राणत्याग केला. त्यांच्या निधनाची वार्ता त्यांनी प्रायोपवेशन सुरू केल्यानंतर केव्हाही अपेक्षित होती. ५ नोव्हेंबर रोजी विनोबांना ताप आला, त्याबरोबरच हृदयविकारही उद्‌भवला आणि प्रकृती चिंताजनक झाली. उपचार त्वरित सुरू झाले. वैद्यकीय महाविद्यालयाच्या रूग्णालयात उपचार करण्याकरता नेण्याचा विचार तज्ज्ञ डॉक्टरांनी विनोबांना सांगितला; परंतु त्यांनी परंधाम आश्रम सोडण्यास नकार दिला व तेथेच उपचार सुरू झाले. मुंबई येथील जसलोक हॉस्पिटलचे तज्ज्ञ डॉ. मेहता मुंबईहून आले. हळूहळू प्रकृती सुधारेल अशी आशा उत्पन्न झाली. ॲलोपथीचे उपचारही विनोबांनी स्वीकारले, परंतु ८ नोव्हेंबर रोजी रात्री अन्नपाणी आणि औषधे या तिन्ही गोष्टी घेण्यास त्यांनी नकार दिला. आचार्यांचे बंधू शिवाजीराव भावे, मित्र दादा धर्माधिकारी इत्यादी मंडळींनी व आश्रमस्थ भक्तजनांनी आचार्यांना परोपरीने काकुळतीस येऊन, अन्नपाणी व औषधे घेण्याची विनंती केली. ती त्यांनी नाकारली. इंदिरा गांधी विनोबाजींना १० नोव्हेंबर रोजी भेटल्या. अन्नपाणी, औषधे घेण्याची विनंती त्यांनीही केली. प्रायोपवेशनाचा संकल्प करण्याचे कारण आचार्यांनी श्री. त्र्यं. गो. देशमुख व इतर भक्तांना स्पष्ट करून सांगितले. ते म्हणाले- " आता देह आत्म्याला साथ देत नाही. रखडत जगण्यात अर्थ नाही. जराजर्जर शरीर टाकणेच ठीक १९५१ ते १९५३ हा भूदान यात्रेचा कालावधी वगळता सारे आयुष्य त्यांनी वर्ध्याच्या पवनार आश्रमात काढले. भारत सरकारने त्यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# किल्ले बांधणी स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** जनसेवेतून आनंद देणाऱ्या वशेणी इतिहास संपादकीय मंडळाने शाळकरी मुलांच्या कलेला वाव देणे आणि दिवाळीचा आनंद लुटण्यासाठी वशेणी आणि पुनाडे गाव मर्यादीत किल्ले बांधणी स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेतला उदंड प्रतिसाद मिळाला असून ५२ जणांनी सहभाग नोंदवला. विशेष म्हणजे सर्वच्या सर्व किल्ले हे मुलांनी माती पासून तयार केले होते. एक देखील बाजारात मिळणारा किल्ला नव्हता. या किल्ले बांधणी स्पर्धेचे बक्षीस वितरण बाल दिनाचे औचित्य साधून श्री हनुमान मंदिर वशेणी येथे करण्यात आले.

या किल्ले बांधणी स्पर्धेचे परीक्षण मंडळाचे कार्यवाहक मच्छिंद्रनाथ म्हात्रे, संदेश गावंड आणि प्रविण ठाकूर यांनी केले होते.

प्रथम क्रमांक- स्वरा संदेश म्हात्रे ( प्रतापगड), व्दितीय क्रमांक- साई समाधान म्हात्रे (लोहगड), तृतीय क्रमांक- अर्पित प्रविण पाटील (मुरूड- जंजिरा), उत्तेजनार्थ- दक्ष प्रेमनाथ पाटील (मुरूड जंजिरा), उत्तेजनार्थ- वेदांत प्रविण ठाकूर (पुरंदर), लक्षवेधी - पूर्वा प्रताप पाटील (कर्नाळा), लक्षवेधी- आर्या कृष्णा पाटील (पन्हाळा), लक्षवेदी- चित्रलेखा प्रदिप पाटील (तोरणा), लक्षवेधी- रूपेश रोशन पाटील (प्रतापगड), विशेष सजावट - निशा निलेश पाटील या सर्व सहभागी स्पर्धकांना मंडळाकडून भेटवस्तू देण्यात आले. सदर स्पर्धा यशस्वी होण्यासाठी सुरेंद्र म्हात्रे, किशोर म्हात्रे, डॉक्टर रविंद्र गावंड, संदेश गावंड, आदिनाथ पाटील यांचे विशेष योगदान मिळाले.सदर बक्षीस वितरण कार्यक्रमास गणेश खोत, बळीराम म्हात्रे, पंढरीनाथ पाटील, महेश पाटील, ग्रामपंचायत सदस्य सुनिल ठाकूर,अनंत पाटील,निसर्ग म्हात्रे ,जगन्नाथ म्हात्रे, अनंत तांडेल, राम तांडेल , पुरूषोत्तम पाटील आदि मान्यवर उपस्थित होते.एकंदरीत गड किल्ले बांधणी स्पर्धेला जनतेचा, विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.







गेली 29वर्ष समता कृती समितीच्या वतीने गरीबाची दिवाळी साजरी केली जात असून यंदाही जेजुरी पंचक्रोशीत गावोगावी जाऊन दिवाळीचा फराळ गोळा करून तो अनाथ आश्रमतील मुलांना वाटला जातो. याचा प्रारंभ जेजुरी पोलीस स्थानकाचे निरीक्षक बापूसाहेब शेंडकर यांच्या हस्ते मिठाई देऊन करताना समता कृती समितीचे दिगम्बर कदम महेश पेशवे ऍड राहुल कदम पत्रकार प्रकाश फाळके रमेश लेंडे, शिवाजी झोंबडे आदी.

## गोरगरिबांच्या चेहऱ्यावर फुलला आनंद

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** सामाजिक दिवाळी भेट उपक्रमांतर्गत मेळघाटातील चार गावांमध्ये शहरातील निलेश देव मित्र मंडळाच्यावतीने गोरगरिब, गरजूंना कपडे व फराळाचे वाटप करण्यात आले. या चार गावांमधील गरजूंच्या चेहऱ्यावर दिवाळीच्या आनंदात हास्य फुलले होते.ॲड. धनश्री देव स्मृती सेवा प्रकल्पद्वारा संचालित निलेश देव मित्र मंडळाने जुने कपडे संकलन शिबीर आयोजित केले होते. यामध्ये प्राप्त झालेले कपडे शनिवारी मेळघाटातील अढाव, पोपटखेड, शहानुर आणि भिमकुंड या चार गावांमधील गोरगरिबांना मोफत वाटप केले. अकोलेकरांकडून त्यांच्याकडील जुने, परंतु चांगले वापरण्या योग्य कपडे जमा केले होते. या उपक्रमाला भरभरून प्रतिसाद मिळाला. महाबळेश्वर येथून देखील कपडे प्राप्त झाले. तब्बल दोन ट्रक भरून कपडे गोळा झाले. इतर कपडे व वस्तू मेळघाटातील चार गावांमध्ये गरजू नागरिकांना वितरण केले. या उपक्रमासाठी शहरातील सातव चौकातून दोन वाहनांसह संकल्प रथ रवाना झाला. यावेळी प्रा.अंजली आंबेडकर यांनी झेंडी दाखवली. लायन्स क्लब ऑफ मीडटाऊन गोल्डच्या अध्यक्ष अनिता उपाध्याय, कैलास बिचकुडे, डॉ. अशोक ओळबे, लिनेस नम्रता अग्रवाल, सामर्थ्य फाउंडेशनचे पदाधिकारी आदी उपस्थित होते. चिखलदरा तालुक्यातील अढाव गावात प्रत्येकाला कपडे, फराळ, फटाके, चपला जोड वाटप केले.



## बल्लारपूर डब्लूसीएलने छोट्या गाडीमालकांना न्याय द्यावा


आधुनिक केसरी न्यूज

**बल्लारपूर :** क्षेत्र वेकोलि गेल्या काही काळापासून हलक्या मोटार वाहनाच्या एलएमव्ही निविदा जसे की स्कॉर्पिओ/सुमो इत्यादींच्या बहुतांश निविदा एकल किंवा दुहेरी ऐवजी क्लबिंग करून मोठ्या केल्या आहेत, एकेरी वाहनधारक निविदेत सहभागी होऊ शकत नाहीत. या संदर्भात भाजप कामगार मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष अजय दुबे यांनी पालकमंत्री श्री. सुधीरभाऊ मुनगंटीवार यांना निवेदन सादर करून न्याय मिळवून देण्याची विनंती केली.निविदेचे मूल्यांकन ५० लाख किंवा एक कोटी रुपयांच्या वर जाते तेव्हाच हे लक्षात घ्यावे. मोठ्या कंपन्या यामध्ये सहभागी होऊ शकतात.सिंगल/डबल मोटार मालकांना निविदा प्रक्रियेत सहभागी होण्यापासून वंचित ठेवण्यात आले आहे.त्यातील बहुतांश बल्लारपूर किंवा चंद्रपूर जिल्ह्यातील आहेत.वारंवार विनंती करूनही केवळ मोठ्या निविदा काढल्या जात आहेत. या संदर्भात WCL मुख्यालय नागपूर कडून स्पष्ट मार्गदर्शक नाही आहेत.तथापि, या प्रकरणी बल्लारपूर क्षेत्र WCL चे महाव्यवस्थापक श्री सव्यसाची डे यांनी सकारात्मक सहकार्याचे आश्वासन दिले आहे.




महाराष्ट्र Business Katta









# हिंदुत्ववादाची 'एकदम कडक' भूमिका!



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**बाळ केशव ठाकरे ऊर्फ बाळासाहेब ठाकरे हे महाराष्ट्रातील शिवसेना पक्षाचे संस्थापक, राजकारणी व व्यंगचित्रकार होते. सामना या मराठी दैनिकाचे ते संस्थापक तथा मुख्य संपादकही होते. त्यांची हिंदुहृदय सम्राट म्हणूनही लोकांच्या हृदयांवर छाप उमटली आहे. बाळासाहेबांनी दि.१९ जून १९६६ रोजी शिवसेनेची स्थापना केली. त्यांच्या मते समाज सुधारकांची समृद्ध परंपरा असलेला महाराष्ट्र पुरोगामी आहे, परंतु मराठी माणूस मागेच राहिला. महाराष्ट्रात सुविधा आहेत, मात्र मराठी माणूस दुविधेतच. महाराष्ट्रात उद्योग आहेत, पण मराठी तरुण बेरोजगार! तर महाराष्ट्रात पैसा आहे, परंतु मराठी माणूस गरीब आहे.**

महाराष्ट्राला भारतात मान आहे, मात्र मराठी माणूस महाराष्ट्रातच प्रामुख्याने मुंबईत अपमानित होत आहे. शिवसेनेचा पहिला मेळावा याच वर्षी ३० ऑक्टोबरला शिवतीर्थ मैदानावर संपन्न झाला. ज्यात लाखो लोकांचा सहभाग होता. या मेळाव्यापासूनच त्यांची आणि शिवतीर्थावरील-शिवाजी पार्कवरील मराठी माणसांची गर्दी यांच्यामध्ये नातेसंबंध प्रस्थापित होण्यास सुरुवात झाली. त्यांनी सर्वप्रथम एक व्यंगचित्रकार म्हणून सामाजिक प्रश्नांवर भाष्य करण्यास सुरुवात केली. इ.स.१९५०मध्ये ते फ्री प्रेस जर्नलमध्ये व्यंगचित्रकार म्हणून रुजू झाले. पुढील काळात त्यांनी ज्येष्ठ व्यंगचित्रकार आर.के.लक्ष्मण यांच्यासमवेतही काही काळ काम केले. फ्री प्रेस जर्नलमध्ये काम करीत असतानाच ते विविध संस्था, कंपन्या व नियतकालिके यांसाठी चित्रे, व्यंगचित्रे, जाहिरातीचे डिझाइन अशी कामे करीत असत. त्यांच्या व्यंगचित्रात इंदिरा गांधींची व्यक्तिरेखा आवडती होती. बाळासाहेबांचा जन्म महाराष्ट्र राज्यातील मराठी विद्या व संस्कृती यांचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुणे शहरात दि.२३ जानेवारी १९२६ रोजी झाला. हिंदूंच्या पूजापाठ व अंधश्रद्धावर कडाडून प्रहार करणारे प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे हे त्यांचे वडील आणि रमाबाई या त्यांच्या प्रेमळ मातोश्री होत. महाराष्ट्राचे सांप्रत मुख्यमंत्री मा.उद्धवजी ठाकरे हे त्यांचे सुपुत्र तर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष मा.राजजी ठाकरे हे त्यांचे पुतणे आहेत. महाराष्ट्रातील राजकारणात बाळासाहेबांचा प्रचंड दबदबा निर्माण झाला होता. झुणका भाकर केंद्रांची योजना, वृद्धाश्रमांची साखळी, वृद्धांना सवलती, झोपडपट्टी वासीयांना घरे, मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग, मुंबईतील उड्डाणपूल, बॉम्बेचे मुंबई नामकरण अशा अनेक योजना-प्रकल्पांची मूळ संकल्पना ही त्यांचीच होती. व्हॅलेंटाईन डेसारख्या पाश्चिमात्य उत्सवांना विरोध, परप्रांतीयांच्या तसेच बांगलादेशींच्या विरोधातील आंदोलने यांमागचा विचारही त्यांचा होता. त्यामुळेच त्यांना महाराष्ट्राचा वाघ असे संबोधले जात होते. आज त्यांच्या जयंतीच्या मंगल प्रसंगी समस्त कार्यकर्ते



व शिवसैनिक "कोण आला रे, कोण आला? महाराष्ट्राचा वाघ आला!" अशा आरोळ्या ठोकत त्यांच्या प्रतिमेसमोर नतमस्तक होतात.

बाळासाहेबांनी नोकरी सोडून स्वतःचे व्यंगचित्रात्मक साप्ताहिक काढण्याचा निर्णय घेतला. या निर्णयानुसार त्यांनी ऑगस्ट १९६०मध्ये मार्मिक हे साप्ताहिक सुरू केले. साप्ताहिकास मार्मिक हे नाव त्यांना वडील प्रबोधनकारांनीच सुचविले होते. मराठीतील हे पहिले व्यंगचित्र साप्ताहिक ठरले. तेव्हा संयुक्त महाराष्ट्र स्थापन झालेला असतानाही प्रामुख्याने मुंबईत मराठी माणसावर अन्याय होत होता. या प्रश्नाला मार्मिकने वाचा फोडली. महाराष्ट्रात येऊन मराठी माणसाबद्दल अनादर बाळगणाऱ्यांना त्यांनी व्यंगचित्रांच्या माध्यमातून टीका केली. इ.स.१९६०पासून ते राष्ट्रीय व महाराष्ट्र राज्य स्तरावरील प्रत्येक महत्त्वाच्या घडामोडीत, तसेच इतिहासाच्या प्रत्येक टप्प्यावर मराठी लोकांना मार्गदर्शन करत. ते श्याम या बालपाक्षिकाचे सुद्धा संपादक होते. वक्तृत्वाबरोबरच ठाकरे भेदक लेखन देखील करत. प्रबोधनकार केशव ठाकरे व प्रल्हाद केशव अत्रे यांचा प्रभाव त्यांच्या लेखनात जाणवतो. शिवाय व्यंगचित्रकाराची वेधक-वेचक निरीक्षणदृष्टीही त्यांच्यामध्ये होती. सामना हे केवळ शिवसेनेचे मुखपत्र आहे, ज्यात संपादक म्हणून बाळासाहेबांचे अग्रलेख असत. बाळ ठाकरे हे हिंदुत्ववादी होते. बॉंबस्फोट, देशविघातक कृत्ये घडवणाऱ्या धर्मांधांना या देशात राहण्याचा अधिकार नाही. मतपेटीचे राजकारण करत अशा मुस्लिमांचे लांगुलचालन कोणी करू नये. भारताला आपला देश मानणाऱ्या राष्ट्रवादी मुस्लिम लोकांना आपला कोणत्याही प्रकारचा विरोध नाही, असे विचार त्यांनी मांडले. हिंदुत्ववादी भूमिकेमुळे त्यांना शिवसैनिकांनी हिंदुहृदय सम्राट अशी पदवी दिली. त्यांनी दिलेली गर्व से कहो, हम हिन्दु है, ही घोषणाही त्यांच्या राजकारणाचा महत्त्वाचा भाग होती. बाळासाहेब ठाकरे यांना हृदयविकाराचा तीव्र झटका येऊन दि.१७ नोव्हेंबर २०१२ रोजी मुंबईतील मातोश्री या निवासस्थानी त्यांनी चिरनिद्रा घेतली. त्यांच्या पश्चात बरोबर दहा वर्षांनी एकसंध प्रबळ शिवसेनेचे दोन गट पडले आहेत. हे बघून त्यांच्या आत्म्याला असह्य वेदना झाल्या नसतील कशावरून?

# शेतकरी दादांनो आत्महत्या करु नका..!



बुद्धभूषण चं. कांबळे
संपर्क क्र. 7498715661

आधुनिक केसरी

**यंदा मराठवाड्यावर दुष्काळाचे सावट पडल्यामुळे व शेतातील पिके पाण्यावाचून पार करपून गेल्यामुळे शेतकरी दादांच्या हाताला यंदा काहीच लागले नाही त्यामुळे, शेतकरी वर्ग पुरता हतबल झाला आहे व अर्थिक टंचाईचा सामना करत आहे.काही शेतकरी तर पार मेटाकूटीला आले आहेत. त्यांना घर प्रपंच चालवता चालवता नाकीनऊ येत आहे. म्हणून त्यांना सावकाराकडून कर्ज काढावे लागत आहे. अर्थिक चणचण व सावकारी कर्जाचा बोजा सहन होत नसल्यामुळे बहुतांश शेतकरी आत्महत्यासारखे टोकाचे पाऊल उचलत आहेत. परिणामी ते कर्जबाजारी झाल्यामुळे नैराश्य व मानसिक डिप्रेशनमध्ये जाऊन स्वतःला संपवून टाकत आहेत. एवढे टोकाचे पाऊल शेतकरी उचलत आहेत आणि आपल्या घरच्यांना दुःखाच्या खाईत लोटत आहेत.**

दररोज वर्तमानपत्रात व सोशल मीडियावर शेतकरी आत्महत्यांच्या कितीतरी बातम्या वाचायला व बघायला मिळतात.पण हल्ली तसे पाहिले तर दररोज शेतकरी आत्महत्यांचे सत्र सुरूच आहे. हि आपल्यासाठी अतिशय खेदाची व चिंताजनक बाब म्हणावी लागेल.तमाम शेतकऱ्यांना माझी कळकळीची नम्र विनंती आहे की दादांनो उगीच आत्महत्या करुन घरच्यांना दुःखसागरात लोटू नका.तुमच्या पश्चात घरच्यांची काय अवस्था होत असेल याचाही जरा विचार करा.जन्माला आल्यावर मृत्यू अटळ आहे.एक ना एक दिवस सगळ्यांनाच मरायचे आहे.आणि नैसर्गिक मृत्यू केव्हाही चांगलाच असतो.नाही नाही म्हटले तरी एक दिवस सगळ्यांनाच मरायचे आहे.आजवर मरण कुणाच्या बापालाही चूकले नाही.मिळालाय जन्म माणसाचा तर माणसासारखे मस्त मजेत जीवन जगा.
थोड्याशा कर्जापायी मानसिक ताण घेऊन स्वतःचे अनमोल जीवन संपवू नका.काही दिवस निश्चिंत राहा.परिस्थिती बदलेल आणि तुम्हीही मागेपुढे का होईना पण कर्जमुक्त व्हाल येवढे मात्र नक्की पण आत्महत्या यावर पर्याय असूच शकत नाही हे अगोदर लक्षात घ्या.परंतु मायबाप सरकारला माझी कळकळीची नम्र विनंती आहे की बाबांनो यंदा शेतकरी दादा अतिशय अर्थिक अडचणीत आला आहे.तो कर्जबाजारी होऊन शासनाच्या अर्थिक आशेवर बसला आहे.आपण शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करुन व त्यांना काहीतरी अर्थिक मदत जाहीर करावी व आत्महत्येपासून रोखावे,नाहीतर शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण वाढत जाईल. एवढे मात्र खरे....



# मराठ्यांचा सरसेनापती- मनोज जरांगे पाटील



जयेश अ.माधव
संपर्क क्र.9167710614

आधुनिक केसरी

**मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाचा दुसरा टप्पा यशस्वीरित्या संपला आहे. आता पुढे काय..? हे पाहणं खूपच महत्त्वाचे ठरणार आहे. पहिल्या टप्प्यात जरांगे पाटील यांनी सरकारला 40 दिवसांची मुदत दिली. परंतु या चाळीस दिवसात सरकारने आंदोलनाची हवी तशी दखल घेतली नाही. पण या 40 दिवसात जरांगे पाटील यांनी उत्तर महाराष्ट्र पिंजून काढला. आपल्याला आरक्षण का हवं हे सर्व सामान्य जनतेला समजावून सांगितले. आपल्यावर कशाप्रकारे अन्याय होत आहे हे दाखवून दिलं. मराठा आरक्षण विरोधात माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालामुळे कायदेशीर आरक्षण मिळणे यापुढे कठीण होणार आहे.**

त्यामुळे कुणबी मराठा आणि इतर मराठा हे एकच असल्याचे अनेक दाखले उपलब्ध करून सर्व मराठ्यांना कुणबी म्हणून ओबीसी मधून आरक्षण देण्यात यावे अशी मागणी त्यांनी मांडलेली आहे. जरांगे पाटील यांच्या दुसऱ्या टप्प्यातील आंदोलनाने सरकारची झोप उडवली आहे. त्यांनी फक्त आमरण आंदोलन केले नाही तर गावागावात राजकीय नेत्यांना गावबंदी केली. साखळी उपोषणे गावागावात सुरू केली आणि संपूर्ण महाराष्ट्र ढवळून काढला. नक्की काय करावे हे सरकारला सुचेनासे झाले होते शेवटी नवव्या दिवशी सरकारला शिष्टमंडळ पाठवून जरांगे पाटील यांनी वेळ वाढवून देण्यासाठी विनवणी करावी लागली.सरसकट मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याची मागणी सरकारने मान्य केली पण त्यासाठी दोन महिन्यांचा वेळ मागितला तो वेळ त्यांनी देऊ केला आहे पण आंदोलन फक्त स्थगित केले आहे बंद नाही असा इशाराही दिला आहे. या दोन महिन्यात पुन्हा जरांगे पाटील महाराष्ट्र पिंजून काढतील आणि ज्या ठिकाणी ते पोचले नाहीत त्या ठिकाणी पोहोचण्याचा प्रयत्न करतील असे वाटते. पुढील टप्प्यातील आंदोलन हे मुंबईत होईल असे आधीच जाहीर करून टाकले आहे. त्यांनाही सरकार अपेक्षित पाऊल उचलेल याची खात्री नाही. त्यामुळे त्यांनी पुढील आंदोलनाची तयारी आत्तापासूनच करण्याची कार्यकर्त्यांना सूचना देखील केली आहे. अनेक प्रस्थापित राजकीय नेत्यांची त्यांनी झोप उडवली आहे. मराठ्यांचा आतापर्यंत राजकीय पुढाऱ्यांनी वापर करून घेतला आहे.हे मराठ्यांच्या मनावर बिंबवण्यात ते कमालीचे यशस्वी झाले आहेत. त्यामुळेच गावागावातील सर्वपक्षीय राजकीय पुढाऱ्यांचे फोटो काढून टाकले आणि यापुढे मराठ्यांना कोणीही राजकीय पुढाऱ्यांनी गृहीत धरू नये असे सुचवले. मोठ मोठ्या नेत्यांना त्यांच्या पायापर्यंत यावे लागले याचे वैशम्य आहे. मराठे युद्धात जिंकतात पण तहात हरतात असे म्हटले जाते पण यावेळी मराठे युद्धात आणि तहातही जिंकले आहेत. आंदोलना दरम्यान आमदार जयदत्त क्षीरसागर आणि सोळंके या बीड मधील



आमदारांची घरे समाजकंटकांनी जाऊन टाकली. मराठा अशी जीवघेणी आंदोलने करणार नाहीत आपल्या आंदोलनाला बदनाम करण्याचा कोणीतरी कट रचला आहे, असे मनोज जरांगे यांना वाटत आहे. दुसऱ्या टप्प्याचे आंदोलन जरी स्थगित झालेले असले तरी ते संपलेले नाही. सरकारने वाटाघाटी करून जरी जरांगे पाटील यांचे आंदोलन मागे घ्यायला लावलं असले तरी पुढील सर्व सूत्रे जरांगे पाटील यांनी आपल्याच हातात ठेवली आहेत हे स्पष्ट दिसते. जरांगे पाटील यांनी जोपर्यंत सरसकट मराठ्यांना आरक्षण मिळत नाही, तोपर्यंत घरी जाणार नसल्याचे जाहीर केले आहे. जरांगे पाटील हा माणूस जरी साधा सिंगल-पसली दिसत असला तरी समाजाचा प्रचंड विश्वास संपादन केलेला आहे. त्यांनी आंदोलनात कुठेही बंद दरवाजा आड चर्चा होणार नाही किंवा कानातही कूसूफुसू होणार नाही, जे होईल ते सर्वांसमोर आणि कॅमेऱ्या समोर याची काळजी घेतली. त्यामुळेच ते मराठा तरुणांच्या गळ्यातील ताईत बनले आहेत. त्यांच्या एका शब्दावर अनेक मराठा आपल्या जीवाची बाजी लावू शकतात अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. सरकारला जरांगे पाटील यांना हलक्यात घेता येणार नाही.अनेक नेते त्यांच्याबद्दल खूप विचारपूर्वक बोलत असताना दिसत आहे. मराठ्यांना एकत्र आणण्याचे काम निश्चितपणे जरांगे पाटील यांनी केले आहे. यापूर्वी लाखोंची संख्या असलेले ५८ मूक मोर्चे निघाले पण सरकारने या मोर्चांची दखल घेतली नाही. जागतिक पातळीवर या मोर्चाची चर्चा झाली पण सरकारला काही फरक पडला नव्हता कारण त्यावेळी फक्त सेना होती त्या सेनेला सेनापती नव्हता. पण आज मराठ्यांच्या या सेनेला नव्या दमाचा, समाजासाठी आपला जीव पणाला लावणारा सेनापती मिळाला आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील संपूर्ण मराठा समाज मनोज जरांगे पाटील यांच्या पाठीशी ठामपणे उभा राहिलेला दिसून येत आहे. पुढच्या दोन महिन्यात काय घडामोडी घडणार आहे हे पहाणे महत्त्वपूर्ण ठरणार आहे. जरांगे पाटील म्हणत आहेत सरकारला 24 डिसेंबर एवढा वेळ दिला आहे तर सरकार म्हणत आहे जरांगे पाटील यांनी दोन जानेवारीपर्यंत वेळ दिला आहे. विरोधक 31 डिसेंबरला सरकारच पडणार आहे असे भाकीत करीत आहे.तर सदावर्ते यांनी आंदोलना विरोधात हायकोर्टात याचिका दाखल केली आहे. पुढे जे काही होईल ते होईलच.
सरकारचं काहीही झालं तरी मराठे एका सेनापतीच्या नेतृत्वाखाली लढणार आहेत आणि जिंकणार आहेत एवढं मात्र खरं..!!

# 'दिवाळी संध्या' या संगीतमय कार्यक्रमाने उरणकर मंत्रमुग्ध

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** मंगळवार १४ नोव्हेंबर २०२३ रोजी दिवाळी पाडव्याच्या शुभ मुहूर्तावर उरणवासीयांना संगीत नजराणा शिवसेना ( श्री उद्धव बाळासाहेब ठाकरे ) उरण तर्फे माजी आमदार तथा रायगड जिल्हा प्रमुख मनोहरशेठ भोईर यांच्या आयोजनातून सरस्वती संगीत कला वर्ग प्रस्तुत 'दिवाळी संध्या' या संगीत गायनाचा कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता,संगीत विशारद कीर्ती रमेश गोंधळी यांची कन्या कु.आसावरी रमेश गोंधळी तसेच कु युगांती पाटील, प्रेरणा पाटील, कु. अंजली म्हात्रे, कु. संस्कृती मोकल व कु. अवंती गोगटे यांच्या सुमधुर गायनाने उरणकर मंत्रमुग्ध झाले. त्यांना महेश घाटे, मधुकर घोगडे, भूषण गायकर यांनी संगीत साथ दिली तर कार्यक्रमाचे उत्तम निवेदन केशव साळवी यांनी केले, सदर कार्यक्रमात विविध रागामध्ये बंदिश,भक्तीगीते व भावगीते सादर करून उरणकरांना मंत्रमुग्ध केले. या कार्यक्रमाला उरणकरांनी उत्स्फूर्त असा प्रतिसाद दिला होता. या कार्यक्रमाला माजी आमदार मनोहरशेठ भोईर, उपजिल्हाप्रमुख नरेश रहाळकर, शहर संपर्कप्रमुख गणेश म्हात्रे,शहरप्रमुख विनोद म्हात्रे, उपतालुका संघटक के एम घरत, नगरसेवक अतुल ठाकूर, निलेश भोईर, शहर संघटक दिलीप रहाळकर, महेश वर्तक, प्रवीण मुकादम, अल्पसंख्यांक सेलचे विधानसभा अध्यक्ष एजाज मुकादम, शहर अध्यक्ष मुमताज भाटकर, उपाध्यक्ष सायरा खान, शाखा संघटिका रुकसना सय्यद, जेष्ठ कार्यकर्ते मनोज पाटील, सुधाकर पाटील, संतोष पवार, कामगार नेते गणेश घरत, शिक्षक सेनेचे कौशिक ठाकूर, महेश गावंड, रमणीक म्हात्रे, ज्येष्ठ पत्रकार प्रवीण पुरो, जेष्ठ पत्रकार घनश्याम कडू, श्री पवार, पत्रकार विठ्ठल ममतावादे, विधी व न्याय सेलचे उपाध्यक्ष मच्छिंद्रनाथ घरत, सोशल मीडियाचे समन्वयक नितीन ठाकूर, ग्राहक संरक्षण कक्षाचे शहर संघटक संदीप जाधव, विभागप्रमुख संजय गावंड, वैभव करगुटकर, शाखाप्रमुख सचिन पाटील, रमेश गोंधळी, प्रवीण म्हात्रे,गटप्रमुख रुपेंद्र गुडेकर, उपशाखाप्रमुख शाहरुख गडी,नागाव सरपंच सी. के. गायकवाड, ज्येष्ठ नागरीक संघाचे पदाधिकारी चंद्रकांत मुकादम, डॉ.साहेबराव ओहोळ, रमाकांत म्हात्रे, ज्येष्ठ नागरिक व मोठ्या संख्येने उरणकर नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी शिक्षक सेनेचे महेश गावंड यांनी आभार मानले.





# लोणंदच्या महाविद्यालयाचा हँडबॉल स्पर्धेत द्वितीय क्रमांक

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** सातारा विभागीय क्रीडा समिती व शंकरराव जगताप कला व वाणिज्य महाविद्यालय वाघोली,कोरेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने हँडबाल स्पर्धा आयोजित करण्यात करण्यात आल्या होत्या.या स्पर्धेतून खंडाळा तालुक्यातील लोणंद येथील रयत शिक्षण संस्थेच्या शरदचंद्र पवार महाविद्यालयाच्या संघाने द्वितीय क्रमांक मिळवला. या यशाबद्दल महाविद्यालय विकास समितीचे सदस्य यांच्या सह प्र.प्राचार्य,उपप्राचार्य,शिक्षक, शिक्षकेतर सेवक,विद्यार्थी यांनी सर्वांचे अभिनंदन केले. सातारा विभागीय अंतर महाविद्यालयीन हँडबॉल पुरुष या स्पर्धा दिं. १० नोव्हेंबर २०२३ रोजी पिंपोडे विद्यालय ,पिंपोडे या ठिकाणी घेण्यात आल्या होत्या. या स्पर्धेच्या उपांत्य फेरीतील सामन्यात शरदचंद्र पवार महाविद्यालयाच्या संघाने कराड येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचा पराभव करत अंतिम सामन्यात प्रवेश केला होता.या स्पर्धेत महाविद्यालयाच्या संघात गौरव गवळी, कर्तव्य बेंगळे, हर्षद पवार, दिनेश कुंभार, अय्याज सय्यद, तुषार गोवेकर, चैतन्य भुतकर, माऊली आटपाडकर, विशाल बोराटे, योगेश साळुंखे, विनायक नरळे यांनी सहभाग नोंदविला होता. या स्पर्धेत गौरव गवळी व अय्याज सय्यद या दोघांनी नेत्रदीपक कामगिरी केल्यामुळे महाविद्यालयाच्या संघ तासगाव येथे होण्याऱ्या शिवाजी विद्यापीठ अंतर्गत होणाऱ्या अंतर विभागीय हँडबॉल स्पर्ध्येसाठी दुसऱ्या क्रमांकाने पात्र झाला आहे. या संघाला महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक प्रा.संकेत नालकर यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले.त्यामुळे संघाने मोठे यश संपादन करता आले.

# दिवाळी पाडवा, गायगोधन कार्यक्रम उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**गोंदिया :** बलिप्रतिपदा ठिकठिकाणी मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली. यानिमित्ताने गोंदिया जिल्ह्यातील शेतकरी, गोपालक, आदिवासींनी त्यांच्या गोधनाची पूजा केली, त्यांच्या वाजतगाजत मिरवणुका काढल्या.बलीप्रतिपदेच्या दिवशी विविध पध्दतीने गोधनाची पूजा सर्वत्र केली जाते. रानावनात चारण्यासाठी नेण्याचे काम पूर्वी गोवारी समाजातील नागरिक करत होते . त्यामुळे हा दिवस त्यांच्यासाठी खास असतो. गाईला अंघोळ घालून त्यांची रंगरंगोटी केली जाते. गावात जनावरांची मिरवणूक काढून अंगणात ठेवलेले शेणाचे गोधन गाईच्या पावलाने उधळले जाते.

खिल्या मुठया देवस्थानात आदिवासी संस्कृतीचे दर्शन घडवत गोवारी समाजातर्फे गायगोधन कार्यक्रमाची उत्साहात सांगता झाली. पूजेच्या वेळी समाज बांधवांनी भगवान निसर्गदेवता खिल्यामुठयाचे पूजन केल्यानंतर आखर बांधण्यात आला. त्यानंतर गाय गोधनाचा कार्यक्रमात गाई वासरांना खेळविण्यात आले. लक्ष्मीपूजनाचा दुसरा दिवस म्हणजे गायगोधन. मात्र एक दिवस खंड पडल्याने मंगळवारी बलीप्रतिपदा व गायगोधन साजरा करण्यात आला. या दिवशी लोक मोठ्या आस्थेने गोवर्धन पूजा करतात. लोककलेची संस्कृती आणि आस्थेने दर्शन यावर्षीही गोवर्धन पूजेच्या निमित्ताने ग्रामीण भागात पहायला मिळाले. ही पूजा ग्रामीण भागात प्रामुख्याने केली जाते. या पूजेला सर्व गावातील गोमाता, गाय, बैलांचे शेण गोळा करून गावातील आकरावर मध्यभागी जमा होतात. या शेणामध्ये जिवंत कोंबडीचे पिल्लू ठेवले जाते. त्यानंतर मातीचे बैल, गाय, म्हैस, शेळी प्राणी तयार करून गोवर्धन पूजेच्या ठिकाणी एकत्र करतात.

# जयप्रकाश चव्हाण यांची महाराष्ट्र उपाध्यक्ष प्रदेश उपाध्यक्षपदी निवड

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यातील नांदा तांडा येथील भारतीय जनता पार्टी प्रदेश नेतृत्वाने जयप्रकाश चव्हाण यांच्या कार्याची दखल घेत भारतीय जनता पार्टी भटके विमुक्त आघाडी महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली आहे. जयप्रकाश चव्हाण हे स्वच्छ प्रतिमेचे व पक्षाचे एकनिष्ट असल्याचे सर्वस्कृत आहे. बंजारा समाजातील प्रत्येक तांड्यात त्यांचा संपर्क आहे. ते सर्वसामांन्याच्या सुःख दुःखात आवर्जुन सहभागी असतात. गोरे गरिब लोकाच्या अडीअडचणी सोडवतात या सर्व कार्याची दखल घेत उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब,भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे ,ना. केंद्रीय रेल्वेराज्य मंत्री रावसाहेबजी दानवे दादा,केंद्रीय अर्थराज्य मंत्री डॉ.भागवतजी कराड साहेब ,OBC मंत्री अतुलजी सावे साहेब, ग्रामविकास मंत्री गिरीषभाऊ महाजन, माजी विधानसभा अध्यक्ष आमदार हरीभाऊ बागडे नाना, मराठवाडा विभाग संधटन मंत्री संजयजी कोड़गे ,प्रदेश सरचिटणीस संजयजी केणेकर, भाजपा वियुक्त भटके आघाडीचे प्रदेश अध्यक्ष राहुलभाऊ केंद्रे, छत्रपती संभाजीनगर प्रभारी तथा प्रदेश सचिव देवीदासभाऊ राठोड, यांनी त्यांच्यावर ही जबाबदारी सोपवळी आहे. या पूर्वी ते पक्षाचे जिल्हाउपाध्यक्ष,तालुका अध्यक्ष, युवा मोर्चा ता.अध्यक्ष इत्यादी पक्षाची कामे प्रमाणिक राहुन कार्य केलेली आहे, आता ही पुन्हा एक प्रदेश पातळीवरील महत्वाची जबाबदारी त्यांच्यावर सोपविल्या मुळे ,त्यांनी आत्तापर्यंत केलेल्या पक्षासाठी आणि समाजकार्याची दखल घेत पक्षाच्या - नेतृत्वाने यांच्या कार्य कुशलतेवर आणि कर्तृत्वार एक प्रकारे कौतुकाची थाप दिल्याचे मानले जाते. यांच्या या निवडीबद्दल भाजपा अल्पसंख्याक प्रदेश अध्यक्ष इंद्रीसभाऊ मुलतानी, भाजपा प्रदेश सचिव सुरेशभाऊ बनकर, प्रदेश सचिव किरण पाटील, जालना लोकसभा प्रमुख विजय औताडे ,जिल्हाअद्यक्ष सुहासजी शिरसाठ, जिल्हाअद्यक्ष संजयजी खंबीयते, मा.उपमहापौर प्रमोद भैय्या राठोड, जिल्हा सरचिटणीस ज्ञानेश्वर भाऊ मोठे, जिल्हाउपाद्यक्ष सुनिलभाऊ मिरकर, महीला आघाडी जिल्हाअद्यक्ष पुष्पाताई काळे, तालुका अद्यक्ष बद्रीभाऊ राठोड यासह सर्व पदाधिकार्यांनी अभिनंदन केले आहे. यावेळी भाजपाचे मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# समाजसेवक रामनाथ पंडित यांनी केले गरजूंना फराळ वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** सामाजिक कार्यकर्ते तथा रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस रामनाथ पंडित हे गोरगरिबांना नेहमी मदत करत असतात. दिवाळी सणाचे औचित्य साधून गोरगरिबांची दिवाळी गोड व्हावी, गोरगरिबांच्या सुख दुःखात सहभागी व्हावे, त्यांच्या समस्या दूर करण्याच्या अनुषंगाने तारा गाव, जिते गाव तसेच विविध गावातील गरजूंना अन्नधान्य, कपडे, दिवाळी फराळ व मिठाई वाटप केले. गोरगरिबांच्या सुखदुःखात सहभागी होऊन रामनाथ पंडित यांनी गोरगरीब जनतेची दिवाळी गोड केली आहे. एका निराधार जोडप्याला अनेक महिने मोफत अन्नधान्य व किराणा दुकानाचे सामान देखील ते घेउन देत आहेत. त्यांच्या या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.




# पुण्यात पुन्हा 'कोयत्या'ची दहशत

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** भररस्त्यात कोयते उगारून दहशत माजविणाऱ्या अल्पवयीन मुलांसह सराइतांविरुद्ध पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारल्याने चाप बसला होता. कोयते बाळगणाऱ्यांविरुद्ध कडक कारवाई केल्याने सराइतांना जरब बसली होती. त्यानंतर शहरात पुन्हा कोयते उगारून दहशत माजविण्याचे प्रकार वाढीस लागले आहेत. गेल्या काही दिवसांत वैमनस्य, तसेच किरकोळ वादातून कोयत्याने हल्ला करण्याच्या घटना वाढीस लागल्या आहेत. हडपसर भागात मैत्रिणीला संदेश पाठविल्याने जाब विचारणाऱ्या तरुणावर टोळक्याने कोयत्याने वार केल्याची घटना दोन दिवसांपूर्वी घडली.



# पोलिस प्रशासनाची अशीही माणुसकी

## पोनि ब्रह्मा गिरी, स.पो.नि. वर्षा व्हगारे यांच्या वतीने वृद्धाश्रमात किराणा भेट

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**छत्रपती संभाजीनगर :** २४ तास ऑन ड्युटी असणाऱ्या पोलिसांना दिवाळी सारखा महत्त्वाचा सण देखील उत्साहाने साजरा करता येत नाही पण याच पोलीस अधिकाऱ्यांनी बेवारस अवस्थेत फिरणाऱ्या वृद्धांच्या सेवेकरिता चालू असलेल्या जटवाडा रोड येथील माणुसकी वृद्ध सेवालय येथे वृद्धांचा आनंद द्विगणित केला वृद्धाश्रमात लागणाऱ्या किराणा साहित्य व फराळ भेट देऊन ब्रह्मा गिरी साहेब वरिष्ठ पोलीस निरीक्षक वेदांतनगर व सहाय्यक पोलीस निरीक्षक वर्षा व्हगारे रेल्वे लोहमार्ग संभाजीनगर यांनी जबाबदारी उचलून माणुसकी वृद्ध सेवालय येथे किराणा साहित्य पोहोच केले. दिवाळी म्हटले की आनंद उत्साह जल्लोष दिव्यांचा लकलखात आलाच नवीन कपडे फराळ हे सर्व काही दिवाळीनिमित्त प्रत्येक घरात असतेच मात्र बेवारसांसाठी चालवल्या जाणाऱ्या या माणुसकी वृद्ध सेवालयामध्ये समाजसेवक सुमित पंडित हे आमच्या शहरातील व ग्रामीन भागातील कुठल्याही पोलीस स्टेशन हद्दीमध्ये असे व्यक्ती आढळून आल्यास आम्ही हक्काने त्यांच्या सेवालयामध्ये अन्न वस्त्र निवारा याकरिता कागदोपत्री पूर्तता करून पाठवीत असतो ते कुठल्याही शब्द न टाळता अशा वृद्धांची सेवा करतात म्हणून जिथे कोणी पोहोचत नाही तिथे आम्ही पोहोचण्याचे काम केले आहे. त्यामुळे आम्हाला खरंच दिवाळी अनोख्या पद्धतीने साजरा करण्याचा आनंद मिळाला आहे. यावेळी ब्रह्म गिरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक वेदांतनगर व वर्षा व्हगारे साय्यक पोलीस निरिक्षक रेल्वे लोहमार्ग माणुसकी वृद्ध सेवालयाच्या संचालिका पूजा पंडित, समाजसेवक सुमित पंडित व आश्रमातील वृद्ध उपस्थित होते.

त्यांना' दुःख देण्याचा आमचा काय अधिकार यावेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक ब्रम्हा गीरी वेदांतनगर हे म्हणाले की ज्या आई-वडिलांनी आम्हाला लहानाची मोठे केले स्वतः दुःख सहन करून आम्हाला सुखाची सावली दिली असे असताना अशा आई-वडिलांना एकटे सोडून देणे हे समाजातील भीषण वास्तव दर्शवत आहे. दिवसेंदिवस असे निदर्शनास येत आहे की आपल्या आई-वडिलांचा सांभाळ करण्याकडे मुलांचे दुर्लक्ष होत आहे आणि परिणामी त्यांना अशा हलाकाच्या परिस्थितीमध्ये आयुष्य जगावे लागत आहे तेव्हा नवीन पिढीने आपल्या संस्कृतीचा संस्काराचा आदर्श घेऊन आई-वडिलांची सेवा करावी.



# 'ती' प्रियकरासोबत पळून जाण्याच्या बेतात, पतीने पकडले रंगेहाथ

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** प्रियकरासह पळून जाण्याच्या बेतात असलेल्या पत्नीस पतीने प्रियकरासह रंगेहाथ पकडले आणि प्रिकरास चोप देत धारदार चाकूने भोसकले. ही घटना सोमवारी येथील पंचशील नगरात घडली. या घटनेने परिसरात चांगलीच खळबळ उडाली. निखील अविनाश मेश्राम (२५) रा. पंचशीलनगर तलावफैल असे जखमी युवकाचे नाव आहे. त्याचे यवतमाळनजीकच्या बोरगाव धरण येथे राहणाऱ्या एका विवाहित महिलेशी सूत जुळले. निखील हा कार वॉशिंग सेंटरवर काम करीत होता. विवाहितेच्या पतीला या संबंधाचा संशय आला. तो दोघांवरही पाळत ठेऊन होता. पतीपासून सुटका करून पळून जाण्याचा बेत प्रियकर-प्रेयसीने आखला. त्याप्रमाणे दिवाळीच्या दुसऱ्या दिवशी पळून जाण्याचे निश्चित झाले. प्लॅनप्रमाणे विवाहिता प्रियकरासोबत पळून जाण्याच्या तयारीत होती. याची कुणकुण विवाहितेच्या पतीस लागली. त्यामुळे पाळतीवर असलेल्या पतीने दोघांनाही पंचशीलनगर परिसरात पकडले. तिथे पती आणि प्रियकराची झटापट झाली. चिडलेल्या पतीने निखीलवर चाकूने सपासप वार केले. निखीलच्या पोटात चाकूचे घाव लागले. या प्रकरणी शहर पोलिसांनी कलम ३०७ भादंविनुसार गुन्हा दाखल करून आरोपी पतीला अटक केली. ही कारवाई ठाणेदार सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनात अंकुश फेंडर, प्रदीप नाईकवाडे, संतोष व्यास, किरण पघडण, सुनील पैठणे यांनी केली. जखमी निखीलला येथील वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करण्यात आले. चाकूहल्ल्यात गंभीर जखमी निखील मेश्राम याच्यावर शस्त्रक्रियागृहात उपचार सुरू असताना दुसरीकडे अपघात कक्षातून मात्र वैद्यकीय अधिकाऱ्याने निखील मेश्रामचा मृत्यू झाल्याचा अहवाल (डेथ मेमो) शहर पोलीस ठाण्यात पाठविला. यामुळे एकच गोंधळ उडाला. निखील मेश्राम जीवंत असून त्याची प्रकृती स्थिर असल्याचे माहीत होताच पोलिसांकडे पाठविण्यात आलेला मृत्यू अहवाल परत बोलविण्यात आला.

# त्यांच्यापासून अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा घ्या : प्राजक्ता हनमघर

## सावित्रीबाई फुले यांच्या नायगावांत दीपोत्सव साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** बहुजनांवर ज्या सनातन्यांनी जे शेणाचे हल्ले केले.ते आताही आपण तसेच करायला लावायचे का? अजून ही आपल्याला बदलायचे नाही का ?ज्या आपल्या बापानी हयात घालविली.

आपल्याला बरोबर त्याच्या विरुद्ध वागण्याचीच मज्जा येत आहे का? तर तसे नको करुयात ना.त्यांनी विधवांसाठी मंडळ सुरू केलं.

सावित्रीबाईंनी त्यावेळी हळदी कुंकू तिळगुळ समारंभ केला होता.तिथं लिहिलं होतं.हा सर्व प्रकारच्या बायकांसाठी आहे.जे आताही आपल्याला जमत नाही.त्यांच्या पासून काही प्रेरणा घ्यायची असेल तर अन्याया विरुद्ध लढण्याची प्रेरणा घ्या. आपण ठाम राहण्याची घ्या, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध अभिनेत्री प्राजक्ता हनमघर यांनी केले.क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या नायगाव या जन्मभूमीत सूर्यरत्न युथ फाउंडेशन यांच्या वतीने दीपोत्सव समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी सुप्रसिद्ध अभिनेत्री प्राजक्ता हनमघर यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.सिने अभिनेत्री प्राजक्ता हनमघर आणि दिग्दर्शक उमेश थोरात तसेच आगामी चित्रपट बाहेरची साडी यांची संपूर्ण टीम च्या प्रमुख उपस्थितीत व इतर मान्यवरांच्या हजेरीने "दिवाळी सावित्रीच्या माहेरची" या अनोख्या उपक्रमातून दीपोत्सव समारंभ साजरा करण्यात आला.आपण हल्ली संस्कृतीच्या नावाखाली खूप वेगळ्या गोष्टी करतो. एकमेकांशी प्रेमाने वागणे ही संस्कृती आहे. आपल्या भाकरीतील अर्धी भाकरी दुसऱ्यांना देणे ही आपली संस्कृती आहे, असे सुद्धा प्राजक्ता हनमघर यांनी म्हटले. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्मारक येथे फुले दांपत्यास अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमातून विभागीय वन अधिकारी डॉ.सुजित नेवसे,पशुधन विकास अधिकारी डॉ.आशिष फरांदे,सह दिग्दर्शक सिद्धेश नेवसे, टी.सी.कॉलेजचे बारामती उपप्राचार्य वैशाली माळी,प्रा.भगवान माळी, सरपंच साधना नेवसे, उपसरपंच रेश्मा कानडे,किल्ले परीक्षक किरण पवार यांच्या हस्ते "किल्ले बनविणे स्पर्धांचे बक्षीस वितरण" तसेच यावर्षीचा "दुर्गभ्रमंती पुरस्कार" विंग येथील अमोल राजाराम तळेकर यांना देण्यात आला."सन्मान सावित्रीच्या लेकीचा" हा महाराष्ट्र पोलीस श्रुतिका नेवसे,आकांशा कांबळे,अस्मिता नेवसे यांना तर "विशेष पुरस्कार" ज्ञानेश्वर माने,नवनाथ माने, नंदकुमार सुतार,यशवंत खाकरे यांना वितरित करण्यात आला.यावेळी संस्थेचे अध्यक्ष हितेश नेवसे,सचिव लक्ष्मण नेवसे,उपाध्यक्ष दत्तात्रेय पवार, सहसचिव गणेश जाधव, खजिनदार सागर नेवसे, कार्याध्यक्ष स्वप्नील नेवसे, प्रवीण पवार,भूपेंद्र दगडे, गुरुदेव कुरपड, सुजय नेवसे, मनीष गायकवाड, अनिकेत जगताप, वैभव कुंभार, शुभम भोसले, प्रतीक्षा कोरडे, सिद्धी माळी, अंकिता नेवसे तसेच संस्थेचे सर्व सभासद उपस्थित होते.

फुले दांपत्याच्या कार्याबद्दल गौरव करताना प्राजक्ता हनमघर पुढे म्हणाल्या की,त्यांनी ज्या समाजासाठी प्रयत्न केले, त्यांनी दत्तक घेतलेला मुलगाही त्यांच्या जातीचा नव्हता. त्यांनी जेव्हा देह सोडला तो ही त्यांच्या साठी गेला नाही. लोकांना प्लेग मधून वाचवण्यासाठी शेवटच्या क्षणापर्यंत समाजासाठी लढत होत्या. आपण थोडं त्यांचं स्वप्न जगूयात. आपला समाज इथून पुढची मुलं,ह्या मुलांना कळत नसेल आपण कुठं जन्माला आलो आहे. त्यांना मोठं झाल्यावर कळेल की आपली भूमी किती पावन आहे. इथून पुढचा समाज जात, धर्म, लिंग, रंग रहित असावा.आपण माणूस म्हणून एकमेकांशी वागूयात,माणुस म्हणून एकमेकांना मान देऊयात,हे करताना रोज कृतघ्न राहूयात की एका बाईनी आपली हयात घालविली म्हणून आपल्या सगळ्या जाती धर्माच्या बायकांना आता आज हे करता येतंय.असे सुद्धा त्यांनी म्हटले. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे घर अगदी विद्युत रोषणाईने सजविण्यात आलेले होते. परिसरात अगदी झगमगाट पाहायला मिळत होता. यावेळी नायगावकर ग्रामस्थ उपस्थित होते.





# फुले विद्यालयात प्रदूषणमुक्त दिवाळीची शपथ

आधुनिक केसरी न्यूज

**पहूर :** ता . जामनेर पहुर येथील महात्मा फुले शिक्षण संस्था संचलित सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयात जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी केलेल्या आवाहनानुसार इको फ्रेंडली क्लब तर्फे विद्यार्थ्यांनी प्रदूषण मुक्त दिवाळीची शपथ घेतली. वाढत्या प्रदूषणामुळे निसर्गाचा समतोल ढासळत आहे. प्रदूषण मुक्त दिवाळी साजरी करून आपण पर्यावरणाचे मित्र म्हणून विद्यार्थ्यांनी संदेश वाहक म्हणून कार्य करावे, असे प्रतिपादन इको फ्रेंडली क्लबचे अध्यक्ष शंकर भामेरे यांनी केले. यावेळी ज्येष्ठ विज्ञान शिक्षक बी. एन. जाधव यांनी विद्यार्थ्यांना प्रदूषण मुक्त दिवाळीची शपथ दिली. याप्रसंगी सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# पोलिस पाटील रायभान सोनवणे यांचा गौरव



आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील लोणी- बोडखा झरी व इंदापूर या चार गावांचे पोलिस पाटील रायभान सोनवणे यांनी उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले आहे.

पालकमंत्री संदीपान भुमरे यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी आमदार प्रदीप जयस्वाल, विशेष पोलिस महानिरीक्षक ज्ञानेश्वर चव्हाण, पोलिस अधीक्षक मनीष कलवानिया, अप्पर पोलिस अधीक्षक सुनील लांजेवार हसन शहा रामेश्वर कणके माजी तंटामुक्ती अध्यक्ष बाजार सावंगी पुंजाजी अण्णा नलावडे आदी मान्यवरांची उपस्थिती होती.



# गोवंश कत्तलखान्यामध्ये घेऊन जाणारी अशोक लेलँड गाडी पोलिसांच्या ताब्यात

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**फुलंब्री :** तालुक्यातील वडोद बाजार येथील दि १३ रोजी वार सोमवार आठवडी बाजारामध्ये गाडी नंबर MHO2CE1939 अशोक लेलँड गाडीमध्ये सहा गोवंश दाटी करून सनी घेऊन जाण्याच्या वेळी वडोद बाजार ते जातेगाव रस्त्यावर काही गावातील गाडीमध्ये जनावरे गोवंश मोठमोठ्याने ओरडत होते त्यामुळे शिवाजी वाघ गोविंद कोलते व ग्रामस्थांनी ती गाडी अडवली त्यामध्ये गाडी चालवणाऱ्याकडे गोवंश जनावरे वाहतुकीचा परवाना नव्हता त्यामध्ये दोन बछडे खाली पडलेले होते चार उभे होते असे एकूण सहा गोवंश गाडीमध्ये गच्च दाटी करून भरलेले होते गोवंशाची खात्री करून घेतली हे गोवंश कत्तलखान्याकडे कत्तल साठी नेत आहे असं कळालं गोवंश कत्तल साठी घेऊन जात आहे. त्यानंतर वडोद बाजार पोलीस स्टेशनला कळवलं पोलीस स्टेशन घटनास्थळी येऊन गाडी ड्रायव्हर व गाडी व गोवंश वडोद बाजार पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांनी ताब्यात घेतले गोवंशाची हालत गंभीर खराब होती घटनास्थळी येऊन ग्रामस्थांनी हळहळ व्यक्त केली.

त्यानंतर ग्रामस्थांच्या व पोलिसांच्या प्रयत्नाने सहा मुक्या जनावरांचा गोवंशांचा जीव वाचला पोलीस प्रशासन वेळेवर आल्यामुळे त्यांचे गो प्रेमी व शेतकऱ्याकडून ग्रामस्थांकून अभिनंदन होत आहे मात्र रात्रीच्या वेळी पोलीस स्टेशन यांनी गोवंश पकडलेले कुठल्या आधारावर सोडण्यात आली असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांमध्ये पडला आहे. काही देवाण-घेवाण करून सोडले की काय पोलीस स्टेशनला कुठलेही गाडीचा वाहतूक परवाना नसताना प्राणी महाराष्ट्र प्राणी सुरक्षा कायदा 1995 आणि प्राणी वृद्धी कायदा 1960 अंतर्गत पोलिसांनी कारवाई केली का नाही असा प्रश्न नागरिकांमधून होत आहे ज्या गाडीमध्ये गोवंश अवैध घेऊन जात असताना ती गाडी गाडी चालक गोवंश पोलिसांनी ताब्यात घेतले असताना सोडून कोणत्या आधारावर दिले असा प्रश्न वाहतूक करून तत्तर साठी घेऊन जात असताना नागरिकांमध्ये पडला आहे कुठलेही न्यायालयात हजर न करता पोलीस ठाणे पोलीस स्टेशन मध्येच उघडले न्यायालय असा प्रश्न नागरिकांमध्ये होत आहे. ह्या संदर्भात माहिती विचारणा करिता पत्रकार पोलीस स्टेशनला संपर्क केला असता पोलीस अधिकारी फोन घेत नाही.



# जय मिलिंद सन्मान २०२३ पुरस्कार व सत्कार सोहळा संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**वानखेड :** दि. १३ नोव्हेंबर २०२३ रोजी वानखेड गावातील सामाजिक चळवळ गतिमान व्हावी या उद्देशाने वानखेड गावामध्ये जय मिलिंद क्लबची सुरवात करणाऱ्या व्यक्तीचा गौरव मिलिंद बुद्ध विहार वानखेड येथे आयोजित करण्यात आला होता. या पुरस्कार व गौरव सोहळ्यामध्ये भाऊ भोजने( जेष्ठ पत्रकार व साहित्यिक) यांची अध्यक्ष म्हणून तर प्रमुख पाहुणे जी.बी.निंबाळकर (PSI वरिष्ठ तांत्रिक पोलीस अधिकारी बुलढाणा) यांची प्रमुख उपस्थिती होती. आपल्या काळामध्ये तीन पिढ्याच्या आधी जय मिलिंद क्लबच्या मार्फत सामाजिक चळवळीमध्ये महत्वपूर्ण योगदान देणाऱ्या समाज नायकांना यावेळी मिलिंद सन्मान २०२३ या महत्वपूर्ण पुरस्काराने त्यांना गौरवांकित करण्यात आले.

*प्रा. आंनद भोजने (कोल्हापूर) यांच्या संकल्पेतून* साकारलेला हा ऐतिहासिक अभूतपूर्व पुरस्कार व सत्कार सोहळा *अश्वघोष आर्ट अँड कल्चरल फाऊंडेशन कोल्हापूर आणि जय मिलिंद क्लब वानखेड* यांच्या संयुक्त विध्येमाने आयोजित करण्यात आला. या सोहळ्यामधे जात,धर्म,पंथांच्या भिंती तोडून माणुसकीचे नाते जपत सामाजिक सलोखा व सामाजिक ऐकता जपणाऱ्या जय मिलिंद क्लबच्या सर्व समाज नायकांचा शब्दरुपी गौरव*भाऊ भोजने( जेष्ठ पत्रकार व साहित्यिक)* यांनी विस्तृत स्वरूपात केला.. या प्रसंगी भाऊ भोजने पुढे आपल्या अध्यक्षीय समारोपात बोलतांना म्हणाले की माणसाला मांणसासोबत जोडनारा हा सन्मान सोहळा आहे. हा घडलेला वानखेड गावातील मानुसकीचा व सामाजिक सलोख्याचा इतिहास कोणीही शेवट पर्यंत विसरु शकनारच नाही असाच.. या वेळी जय मिलिंद क्लब स्थापन केलेल्या समाज नायकांचा गौरव प्रमुख पाहुणे व अध्यक्ष यांनी शाल,पंचशीलेचा दुप्पटा,गोल्ड मेडल, सन्मान पत्र,सन्मान चिन्ह देऊन केला. या सोहळ्यासाठी विविध समाजातील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होते.

# समता शाळेत दिवाळी पहाट कार्यक्रमाची उत्साहात सांगता

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** येथे भाजपा जिल्हा अध्यक्ष श्री सुहास भाऊ शिरसाट व शिरसाठ परिवार यांच्या वतीने दिवाळी पहाट अभिजात संगीताचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता भारत-पाक सीमेवरही आता छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभारण्यात आला असून महाराष्ट्राच्याच नव्हे तर देशाच्या मातीला सुद्धा छत्रपती शिवाजी महाराजांशिवाय पर्याय नाही, असे प्रतिपादन आमदार हरिभाऊ बागडे यांनी व्यक्त केले. फुलंब्री शहरातील समता शाळेमध्ये सोमवारी (ता. १३) आयोजित दिवाळी पहाट कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी अँड. त्र्यंबकराव शिरसाट, भाजपचे जिल्हाध्यक्ष सुहास शिरसाठ, सभापती राधाकिसन पठाडे, भाजपचे तालुकाध्यक्ष सांडू जाधव, अशोक गरुड शिवाजी पाथ्रीकर, रामबाबा शेळके, माजी जि.प.सदस्य पार्वती शिरसाट, भाजप शहराध्यक्ष योगेश मिसाळ, युवा मोर्चाचे शहराध्यक्ष वाल्मीक जाधव, राम बनसोड, रामेश्वर चोपडे यांची प्रमुख उपस्थिती होती. भाजपचे जिल्हाध्यक्ष सुहास शिरसाठ यांच्यावतीने आयोजित कार्यक्रमासाठी ज्ञानेश्वर मोटे, अशोक गरुड, दिनकर पाटील, ॲड. सुदेश शिरसाठ, रवींद्र काथार, अजय शेरकर, बाळू तांदळे, भगवान निराशे, नाथा काकडे, रोशन अवसरमल, सचिन शेरकर आदींनी परिश्रम घेतले. दरम्यान, या कार्यक्रमाला केंद्रीय रेल्वेमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांचीही भेट उपस्थिती होती.





मनसेप्रमुख राजसाहेब ठाकरे यांच्या आदेशावरून तसेच रामदास पाटील पनवेल तालुका अध्यक्ष मनसे, अरविंद पाटील वावंजे विभाग अध्यक्ष मनसे,यांच्या नेतृत्वाखालील पनवेल तालुक्यातील झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकीत देवेंद्र सुदाम दरे यांचे नितलस ग्रामपंचायत उपसरपंच पदी निवड झाली. देवेंद्र दरे यांची उपसरपंच पदी निवड झाल्याबद्दल मनसेचे उपसरपंच देवेंद्र दरे यांचा पनवेल तालुका प्रमुख रामदास पाटील यांनी सत्कार केला. मनसे अध्यक्ष राज साहेब ठाकरे यांची तोफ महाराष्ट्रातील होणाऱ्या निवडणुकांमध्ये धडाडेल.मनसे पुढाकार घेणार आणि आघाडी मारणार ग्रामपंचायतीचा विकास हाच आमचा ध्यास आणि तो लोकांना जनतेला आवडेल हीच आमची अपेक्षा असे मत रामदास पाटील यांनी व्यक्त केले.

हिवराळे क्लिनिक ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन, ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे

पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन
अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# महिलेचा विनयभंग प्रकरणी हेमंत पाटील यांचे निलंबन

## पी.आय.चे अश्लील कृत्य प्रकरण उघकीस

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांनी एका पीडित महिलेकडे शारीरिक सुखाची मागणी करत अश्लिल वक्तव्य करून मोबाईल व्हॉटस अ‍ॅपवर व्हिडीओ कॉल करुन, तिचे अंगावरील कपडे काढायला लावले. कपडे काढले नाहीतर धमक्या देत तुझी समाजात बदनामी करेल, अशी वेळोवेळी व्हॉटसअ‍ॅपवर व्हिडीओ कॉल करुन, नग्न अवस्थेत व्हिडीओ रेकॉर्ड करुन ठार मारण्याच्या धमक्या देत होते, असा आरोप फिर्यादी महिलेने केला आहे. बळजबरीने शारीरिक संबंध केल्याने कलम 376 च्या नुसार त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नाशिक परिक्षेत्र पोलीस महानिरीक्षक यांनी शासकीय सेवेतून निलंबित केले आहे.

हस्तमैथुन करण्याचा व्हिडीओ सोशल मिडीयावर व्हायरल केला. याबाबत कुठे वाच्यता केली तर तुझे मरण नक्की जवळ आले आहे; असे फोनद्वारे आरोपी व त्याचे साथीदारांनी धमक्या दिल्या म्हणून मुख्य आरोपी तत्कालीन पोलीस निरीक्षक हेमंतकुमार प्रभाकर पाटील हल्ली नेमणूक नंदुरबार यांच्याविरुध्द तसेच सह आरोपी यांनी पिडीत महिलेला वेळोवेळी फोन करुन धमकावले म्हणून दि. 11 रोजी 23.41 वा. देवपूर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. 281/ 2023 भादंवि क. 354 (अ), 354 (ब), 354(ड), 509, 506, 34 सह आय.टी. अ‍ॅक्ट 67 व 67 (अ) व बळजबरीने शारीरिक संबंध केल्याने 376 प्रमाणे पिडीत महिलेने दिलेल्या फिर्यादवरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे. व सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक, धुळे शहर पोलीस स्टेशन हे करीत आहेत.

आरोपीचा शोध घेण्याकरिता स्थानिक गुन्हे शाखा व पोलीस स्टेशन यांचे संयुक्त पथके रवाना करण्यात आले आहेत. सदर प्रकरण संवेदनशिल असुन त्याचा सखोल तपास चालू आहे.




# डॉ.सतीश नेवे यांना धन्वंतरी पुरस्कार प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** NATIONAL INTEGRATED MEDICAL ASSOCIATION, शाखा जळगाव जामोद च्या वतीने दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुध्दा दि.10 नोव्हेंबर 2023 रोजी भगवान धन्वंतरी जयंती साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाची सुरुवात श्री धन्वंतरी पूजन व आरतीने करण्यात आली. तसेच गत अनेक वर्षांपासून जळगाव आणि परिसरात वैद्यकीय सेवा देणारे माजी वैद्यकीय अधिकारी डॉ. सतीश नेवे यांना या वर्षीचा "धन्वंतरी पुरस्कार 2023" देऊन गौरविण्यात आले. या सोहळ्यामध्ये डॉ. नेवे यांना सहकुटुंब आमंत्रित करून त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. नेवे यांनी ईतर डॉक्टर मंडळींना मोलाचे मार्गदर्शन केले तसेच आपल्या प्रदीर्घ काळापासून करत असलेल्या सेवेतील अनुभव कथन केले. सदर कार्यक्रम हा निमा अध्यक्ष डॉ. सतिश प्रल्हाद शिरेकार, (बालरोग तज्ञ) यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन पूर्वक पार पडला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निमा कोषाध्यक्ष डॉ. वैभव खिरोडकार (स्त्री रोग तज्ञ) यांनी केले. तसेच या ठिकाणी निमा अध्यक्ष डॉ सतिश प्र शिरेकार, सचिव डॉ मंगेश बडेरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. आणि डॉ. श्रीकांत अढाव यांनी आभारप्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता झाल्याचे घोषित केले. सदर कार्यक्रमला डॉ अनिल कुळकर्णी सर , यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच निमा जळगाव जा तालुका शाखा अध्यक्ष डॉ. सतिश प्रल्हाद शिरेकार, उपाध्यक्ष डॉ. आदित्य जाधव, डॉ. तनवीर, सचिव डॉ. मंगेश बडेरे, सहसचिव डॉ. सचिन काळपांडे आणि डॉ. सागर टावरी , आयोजक डॉ. अतुल उमाळे आणि डॉ. अतुल खर्चे, राज्य प्रतिनिधी डॉ. प्रवीण कपले, डॉ. संतोष शिंदे, कोषाध्यक्ष डॉ. वैभव खिरोडकार, सोशल मीडिया प्रमुख डॉ. श्रीकांत अढाव , निमा WOMEN'S FORUM अध्यक्ष डॉ. सौ. मंगला काळपांडे, सचिव डॉ. सौ. वैशाली उमरकर, सल्लागार मंडळातील डॉ. अतुल गट्टानी, डॉ. पी. आर. उमरकर, डॉ. अनुप शर्मा, डॉ. दिलीप डाबरे, तसेच डॉ. सौ किरण अक्षय ढोकणे, डॉ सौ रश्मी खिरोडकार, डॉ.आशा सतिश शिरेकार, डॉ. अतुल अंबडकार, डॉ.पवन सुरपाटने , डॉ.आदित्य ढोकणे डॉ.तन्वीर , डॉ शंकर मिसाळ, डॉ. गोविंद वानखेडे व सौ.वानखडे, डॉ मो.शकील तसेच निमा संघटनेतील ईतर सर्व डॉक्टर्स मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संवैधानिक पदावरील व्यक्तीकडूनच मराठा आरक्षणाला विरोध

## तत्काळ पदच्युत करण्याची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** देशामध्ये कोणत्याही संविधानिक मागणीसाठी आंदोलन करण्याचा अधिकार भारतीय राज्यघटनेच्या कलम १९ प्रमाणे नागरिकांना आहे. आपल्या हक्क कायदा याबाबत काही लोकप्रतिनिधी संविधानिक पदावर बसून समाजा समाजात जातीय तेढ निर्माण करणारे वक्तव्य करत असल्याने त्यांना तात्काळ संविधानिक पदावरून पाय उतार करावे या मागणीसाठी सकल मराठा समाजाने गुरुवार ९ नोव्हेंबर रोजी जिंतूर तहसीलदार यांच्यामार्फत मुख्यमंत्री यांना निवेदन दिले आहे. विविध संविधानिक पदावरील व्यक्तीकडून वारंवार होत असलेल्या वक्तव्यामुळे मराठा समाज आक्रमक झाला. संविधानामध्ये कुठल्याही प्रकारची तरतूद नसलेल्या किंवा कोणत्याही कायद्यात तरतूद नसलेल्या मागणीसाठी आंदोलन करणे बेकायदेशीर आहे.

मराठा समाजाला भारतीय घटनेतील कलम 16 4 व कलम 15 4 या दोन कलमाखाली ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावे यासाठी गेली 50 वर्ष लढा चालू आहे तथापि महाराष्ट्रातील काही नेतेमंडळी व त्यांच्या मार्गदर्शनाखाली काम करणारे त्यांचे कार्यकर्ते मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळू देणार नाही अशा पद्धतीची असंवैधानिक वक्तव्य करून जाती जातींमध्ये तेढ निर्माण करत आहेत.तसेच ते मराठा समाजास आरक्षण मिळाले तर आम्ही महाराष्ट्र पेटवु असे चिथावणीखोर विधाने करुण जातीय सलोखा बिघडवणार्या स्वयंघोषित OBC नेते छगन भुजबळ, बबनराव तायवाडे व मराठा द्रोही गुणरत्न सदावर्ते यांना तात्काळ अटक करण्याची मागणी मराठा समाजाने केली आहे. आरक्षणाबद्दल सुप्रीम कोर्टाने इंदिरा सहानी केसच्या निकालानुसार ओबीसी आरक्षण हे संवैधानिक ठरवलेले आहे तसेच आरक्षणाची मर्यादा 50% ठरलेली आहे मराठा समाज गेली पन्नास वर्ष ओबीसी आरक्षणाची मागणी करत आहे तथापि मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देऊ देणार नाही अशा पद्धतीची गैर संविधानिक भूमिका काही राजकीय मंडळी घेताना दिसतात मराठा समाजाला ओबीसी प्रवर्ग व्यतिरिक्त इतर कोणतेही आरक्षण देता येत नाही याची माननीय महाराष्ट्र शासनाला कायदेशीर जाणीव आहे.ओबीसी समाज ही काही जात नाही, किंवा धर्म नाही हा एक आरक्षणाचा प्रवर्ग आहे. त्यामूळे जे समाज मागासवर्ग म्हणून आरक्षण मागतात त्यांना ओबीसीतूनच आरक्षण दिले जाते.ओबीसी प्रवर्ग ही काही कोणाची जहागीरी नाही. त्यामूळे "ओबीसीच्या आरक्षणाला धक्का लागु देणार नाही""ओबीसी मध्ये मराठा समाजाला आरक्षण देऊ देणार नाही",ही सर्व विधाने बेकायदेशीर तसेच भारतीय घटनेच्या विरोधात असून अशी विधाने करणाऱ्या कोणत्याही शासकीय पदावर किंवा सरकारचे मंत्री म्हणून काम करणाऱ्या व्यक्तींना करता येत नाहीत अशा व्यक्तींना जबाबदारपणे वागावे लागते त्यांनी घटनेनुसार कामकाज पार पाडू अशी पदभार स्विकारतांना शपथ घेतलेली असते. तसेच कुणाबद्दल ही ममत्व किंवा आकसभाव बाळगणार नाही अशी देखिल शपथ घेतलेली असते त्यांना बेकायदेशीर विधाने करता येत नाहीत त्यांना भारतीय घटनेनुसार नागरिकांना असलेल्या मूलभूत अधिकारांचे रक्षण करावे लागते, नागरीकांच्या विरुद्ध कोणतेही विधान करता येत नाही उपरोक्त विधाने ही भारतीय घटनेच्या विरोधात असून ती बेकायदेशीर आहेत त्यामुळे अशी विधाने कोणत्याही निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना, आमदार, खासदार यांना करता येणार नाहीत आणि जर ती अशी विधाने करत असतील तर त्यांना पदावर राहण्याचा कोणताही अधिकार नाही.

मराठा समाजाला घटनात्मक ओबीसीतील आरक्षण मिळू देणार नाही किंवा ओबीसीतून आरक्षण देऊ देणार नाही, मराठा समाजाला ओबीसीत येऊ देणार नाही अशा पद्धतीच्या गैर घटनात्मक व बेकायदेशीर मागण्या करणे व त्यासाठी आंदोलन करणे या बाबी सुद्धा बेकायदेशीर आहेत आणि अशा बेकायदेशीर आंदोलनाला परवानगी देणे म्हणजे कायद्याची पायमल्ली करणे आहे त्यामुळे महाराष्ट्रामध्ये वेगवेगळ्या ठिकाणी मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीला विरोध करण्यासाठी ओबीसीतून आरक्षण देऊ देणार नाही अशा पद्धतीचे आंदोलने चालू आहेत ही सर्व आंदोलने गैर कायदेशीर व गैरसंवैधानिक असून अशा सर्व आंदोलनांना स्थानिक पोलीस प्रशासनाने परवानगी दिलेले आहेत या सर्व परवानग्या बेकायदेशीर आहेत तेव्हा सदर पोलीस प्रशासनावरती ताबडतोब कायदेशीर कारवाई करून सदर बेकायदेशीर आंदोलने बंद करण्याची सरकारने दखल घ्यावी अन्यथा याबद्दल लोकशाही पद्धतीने तिव्र आंदोलन करण्याचा इशाराही त्यांनी यावेळी दिलेल्या निवेदनाद्वारे प्रशासनास दिला आहे.

# झेंडूच्या फुलांनी दिला शेतकऱ्यांना दिलासा

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** दसऱ्याला मोठा फटका देणाऱ्या झेंडूने दिवाळीत मात्र शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिलाय! दिवाळीत चांगला भाव मिळाल्याने उत्पादक कास्तकाराच्या हाती 'दोन पैसे शिल्लक' आले.दसरा व दिवाळी सणात होणाऱ्या पूजनात व सजावटीत झेंडूचे अनन्यसाधारण महत्व आहे. यामुळे बुलढाणा तालुक्यासह जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात या फुलांची लागवड केली. मात्र दसऱ्याला मागणीच्या तुलनेत आवक जास्त झाल्याने शेतकऱ्यांना मातीमोल भाव मिळाला. जेमतेम २० ते २५ रुपये किलोने विक्री करावी लागली. त्यामुळे त्यांचा अपेक्षा भंग झाला. या तुलनेत दिवाळीत मात्र अगदी वसूबारस ते आज पाडव्यापर्यंत झेंडूला प्रतवारीनुसार ४० ते ८० रुपये किलो असा चांगला भाव मिळाला. टपोऱ्या आकाराच्या फुलांना शंभरीचा भाव मिळाला. जोरदार आवक असतानाही हे भाव कायम राहिले, हे विशेष. बुलढाणा नगरीत कोलवड, पिंपळगाव सराई, पांगरी उबरहंडे या गावातून मोठी आवक झाली. यामुळे उत्पादक शेतकऱ्यांना दिवाळीने तारले.



गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर